# माणूस

शनिवार । १२ एप्रिल १९८० । ७५ पैसे




एकूण थोडेसे कल्पनादारिद्र्य, साधनसामग्री व पैसा यांचा खूपच अभाव,
रँडच्या वधाच्या राजकीय आणि सामाजिक संदर्भाचे अनाकलन

## यामुळे चित्रपट मनावर ठसतच नाही.

पृष्ठ...७

## शिवाय....

## नागपूरचे विषमता निर्मूलन संमेलन : सविस्तर वृत्तान्त

पृष्ठ...९

# मुंबई-वार्ता

किरण जोग

## ▫ मुंबई विद्यापीठ

शैक्षणिक जगात सतत लिहून कंटाळा यावा अशी जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे मुंबई विद्यापीठ ! 'नेमेचि येतो मग पावसाळा' असे म्हणतात. त्याचप्रमाणे नेमेची मुंबई विद्यापीठाचे वर्ष अत्यंत बेभरोशीपणे सुरू होते व विद्यार्थी सोडन इतर सर्व महत्त्वाच्या घटकांची (?) आंदोलने–मोर्चे–मागण्या वगैरे गोष्टी संपल्यावर हे सर्व संपले असे विद्यार्थ्यांना समजते व वेळेवरती न होण्यासाठी परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या जातात. यंदाचे वर्षही त्याला अपवाद कसे असेल ? नामांतराने 'मराठवाडा' विद्यापीठ गाजल्यावर मुंबई विद्यापीठाचे नाव दशदिशात गाजण्यासाठी 'त्यांनी' आपल्या परीने दिवे लावले नाहीत तरच नवल !

खरे म्हणजे 'मुंबई विद्यापीठ' हा या वेळच्या वार्तापत्रासाठी विषय निवडावा असे खास असे गेल्या आठवडयात काही घडलेले नाही; परंतु वर्षभर जेथे अनाकलनीय गोष्टी घडत असतात त्या 'बंबई युनिव्हरसिटीवर' लिहिण्यासाठी 'अभ्यासाच्या वर्षाची समाप्ती' अशा वेळेपेक्षाही अधिक चांगली वेळ कोणती निवडणार ? अर्थात समाप्ती म्हटली की उत्सव हवा व समाप्तीसाठी मुळारंभही हवी; परंतु इकडे सगळाच कहर आहे. दुसऱ्या सत्राची जी सुरुवात झाली आहे तिची समाप्ती करण्याचे कोणी मनावरच घेत नाही !

म्हणजे काय ? तर ऑक्टोबर १९७९ च्या परीक्षा झाल्या. नवीन नव्हे तर जुन्या भ्यासक्रमाचे विद्यार्थी असलेल्यांच्या या परीक्षा होत्या; परंतु त्या झाल्या डिसेंबर महिन्यात व संपल्या जानेवारीच्या सुरुवातीस. नववर्षाच्या स्वागताच्या रात्रीही (दि. ३१ डिसेंबर) कॉमर्सचे विद्यार्थी जागत होते ते नववर्षाचे स्वागत करण्यासाठी म्हणून नाही तर 'ऑडिट' पेपरचा अभ्यास करण्यासाठी !

असो. आजवरच्या अनुभवाने ऑक्टोबरच्या परीक्षा डिसेंबरमध्ये झाल्या म्हणून विद्यार्थी काही चिडले नाहीत; परंतु सगळयात कहर म्हणजे हे वार्तापत्र लिहिताना (दि. १ एप्रिल) झालेल्या परीक्षांपैकी बी. एस.सी. एम. ए. वगैरे अनेक परीक्षांचे निकाल मुंबई विद्यापीठाने गुलदस्तातच ठेवले होते. कारण काय ? तर मनमानी कारभार व पेपर तपासून घेण्यातली कमालीची गैरव्यवस्था. बी. कॉम. परीक्षेचा निकाल दि. २५ मार्च रोजी लागला. नशीब पाकिस्तानी दैनिकांनी २५ मार्च १९७१ रोजी बांगला–देश नागरिकांची जशी कत्तल केली तशी कत्तल तरी बंबई विद्यापीठाने विद्यार्थ्यांची केली नाही; परंतु खरी गम्मत पुढेच आहे.

हा निकाल जाहीर होण्याआधीच महिनाभर बी. कॉम.च्या एप्रिलसाठीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. ही तारीख आहे २१ एप्रिल ! आता २५ मार्चला निकाल लागल्यावर जे विद्यार्थी नापास होतील ते फॉर्म कधी भरणार ? परत अभ्यास कधी करणार व परीक्षा काय २५ दिवसांत देणार ? अर्थात मुंबई विद्यापीठाने १९७८ च्या १ डिसेंबरला बी. कॉम.च्या विद्यार्थ्यांचे निकाल लावून दि. २५ डिसेंबरला परीक्षा घेण्याचा विक्रम केलेला आहे; पण अशा तारखांचा घोळ कशासाठी ? आता असे समजते की ही २१ एप्रिल ची परीक्षा पुढे जाणार आहे !

निकाल उशीरा लागल्याचे अत्यंत दूरगामी परिणाम होतात. 'आय. ओ. एस्.' 'भारतीय व्यवस्थापन परीक्षा' अशा तऱ्हेच्या बाहेरच्या स्पर्धा–परीक्षांना जे विद्यार्थी बसू पाहतात, त्यांच्यावर या उशिरा निकालांनी आफत ओढवते व अनेकदा या बाहेरच्या परीक्षांच्या तारखा टळतात तरी विद्यापीठ परीक्षांचे निकाल बाहेर येतच नाहीत व त्यामुळे अनेकांना बाहेरची परीक्षा देता येत नाही. यात दोष कोणाचा ? विद्यार्थ्यांना एक वर्ष सोडण्याशिवाय पर्यायच नसतो !

कधीकधी अगदी उलट स्थिती होते. मार्चमध्ये घेण्यात आलेल्या परीक्षांचा निकाल डिसेंबरमध्ये लागतो व ते वर्ष निम्मे संपते. त्यामुळे पुढील दीड वर्षात एखादा विद्यार्थी पदवीनंतरचा कोर्स सुरू करू शकतो विनय सहस्रबुद्धे याने एम. ए. ला प्रवेश घेतला तेव्हा अर्धे वर्ष संपले होते व दीड वर्षात एम. ए. होणे शक्य होईल या हेतूने त्याच्यासारखा एखादा विद्यार्थी प्रवेश घेतो; परंतु दीड वर्षात विद्यापीठ दोन वर्षांचा अभ्यासक्रम कसा काय संपवणार ?

परवाच विद्यापीठातील आणखी एक


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे

अंक : सेहेचाळीसावा

१२ एप्रिल १९८०

किंमत : ७५ पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी ।

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

प्रकरण समजले. यंदा 'डायरेक्टर ऑफ स्टुडंड्स वेलफेअर' या जागेवर शिक्षकेतर व्यक्तीची नेमणूक झाली! याच्याविरुद्ध विद्यापीठाच्या एका सभेत बराच गोंधळही माजला होता. प्रा. विवलकर, श्री. हंस भुग्रा, विद्यार्थीप्रतिनिधी श्री. अशोक देसाई आदींनी श्री. वसंत शिंदे यांच्या या जागेवरील नेमणुकीस जोरदार आक्षेप घेतला, वास्तविक डॉ. अशोक जैन या ठाणा कॉलेजच्या प्राध्यापकांना वर नमूद केलेल्या जागेवरून काढून श्री. शिंदे यांची नेमणूक 'एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल'च्या सल्ल्याने करण्याची काय गरज होती? अशा रीतीने शिक्षकांच्या आरक्षित जागांवर इतरांची वर्णी लागत आहे. असो.

यंदाच्या 'यूथ फेस्टिव्हल'लाही विद्यापीठात विद्यार्थ्यांचा विशेष प्रतिसाद मिळाला नाही. दरवर्षीप्रमाणेच ठराविक कार्यक्रम व ठराविक प्रकार सादर करण्याने कंटाळवाणे झालेले कार्यक्रम यामुळे हा 'यूथ फेस्टिव्हल' 'मोनटोनस' कार्यक्रम होत आहे. अर्थात या व अशा विषयांवर विचार करण्यास विद्यार्थ्यांना वेळ नाही व 'बॉबे युनिव्हर्सिटी टीचर्स युनिअन'सारख्या संघटनाही काही रचनात्मक बदल होतील असे प्रयत्न करताना दिसत नाहीत. एकंदर काय तर 'कालचा गोंधळ बरा होता' असा प्रकार आहे. विद्यार्थी हे सर्व असहाय्यपणे (खरे तर दुर्लक्ष करून) पहात आहे व शताब्दी झालेला 'राजाभाई टॉवरचा वृद्ध मनोरा आपल्या या नवीन पिढीकडे केविलवाणी नजर टाकीत आहे. आनंदी आनंद आहे!

## स्टॅंप्स-प्रदर्शन–डोंबिवली

केवळ मुंबईतच नव्हे तर मुंबईच्या उपनगरातही अनेक वेळा अत्यंत लक्षणीय कार्यक्रम होतात. डोंबिवलीत रोटरॅक्ट क्लबतर्फे झालेले दि. ३० मार्चचे स्टॅंपप्रदर्शन म्हणजे केवळ डोंबिवलीच्या 'छांदिष्ट' माणसांनाच पर्वणी नव्हती तर आसपासच्या लोकांनीही आवर्जून भेट द्यावी इतके हे प्रदर्शन उद्‌बोधक व माहितीपूर्ण झाले.

डोंबिवलीच्या नगरपालिकेच्या दालनात झालेले हे स्टॅंपप्रदर्शन सुरुवातीस दाखवत होते ते महात्मा गांधी यांचे शेकडो स्टॅंप्स. १९६९ मध्ये गांधीजन्मशताब्दिनिमित्त काढलेले हे स्टॅंप्स अत्यंत आकर्षक रीतीने लावण्यात आलेले होते. हे स्टॅंप्स घेतले होते श्री. वसंत गोडबोले यांच्या दुर्मिळ संग्रहातून. महात्मा गांधी हे केवळ भारताचे नव्हते तर सर्व जगात त्यांच्यासंबंधी असलेला आदरच या स्टॅंप्समधून व्यक्त होत होता. माल्टा, मलाया, अमेरिका, रशिया, भूतान, चिली यांसारख्या अनेक विविध देशांतील व मोठमोठ्या प्रसंगांतून चित्रित झालेल्या गांधीजींच्या चित्रांतील भावना हे स्टॅंप्स अत्यंत समर्थपणे दाखवीत होते.

या स्टॅंप्समध्ये जसे तरुणपणचे गांधी होते तसेच ब्रिटिशांशी वाटाघाटी करणारे व मिठाचा सत्याग्रह करणाऱ्या गांधींचे दर्शनही होत होते. एकाच व्यक्तीवरचे विविध प्रसंगांतील व सर्व जगात निघालेले स्टॅंप्स क्वचितच पहावयास मिळतात. महात्माजींच्या स्टॅंप्समुळे हा योग आला. अर्थात काय पाहू व काय नको असे होणे प्रेक्षकांना साहजिकच होते.

स्टॅंप्सचा छंद जरी लहान मुलांचा असला तरी काही लहान मुलांनी आपले सर्व कौशल्य पणाला लावून स्टॅंप्सची मांडणी व लावणी केलेली दिसत होती. विवेक बाबर हा पाचवीत शिकणारा विद्यार्थी हा त्यातीलच एक. भारताच्या नकाशात त्या त्या प्रांताचे वैशिष्टय दर्शविणारे स्टॅंप्स त्यांनी अत्यंत सुयोग्य रीतीने लावले होते. दक्षिणेकडील भागात लावलेला नृत्यकलेचा स्टॅंप, पूर्व भागात लावलेला उद्योगधंद्याचा स्टॅंप व अतिपूर्व भागात चिकटवलेला पर्वतराजींचा स्टॅंप ही काही त्याची वैशिष्टये.

रवी व मुरली या दोन विद्यार्थ्यांनीही स्टॅंप्सची मांडणी कशा प्रकारे करावी हे दाखवून दिलेले होते. त्यांच्याजवळील स्टॅंप्स त्यांनी ज्या पद्धतीने मांडले होते व जसे लावले होते त्यावरून या प्रकारातील त्यांची जाण दिसून येते. वरवर पाहता स्टॅंप्स जमविणे हा प्रकार क्षुल्लक वाटतो; परंतु इतिहासाची, परंपरांची व भौगोलिक अशी अत्यंत उद्‌बोधक माहिती देणारे हे छोटेसे 'स्टॅंप्स' केवळ मुलांच्याच नाही तर सर्व अभ्यासूंच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असतात, ही गोष्ट फारच थोडयांना ठाऊक आहे.

जसजसे जुने होतील तसतसे स्टॅंप्सचे मूल्य वाढत जाते. प्रदर्शनातील काही स्टॅंप्सची किंमत २५० रुपयांपर्यंतही वाढलेली होती. याच प्रदर्शनात लांबलांबच्या 'सेबस्टेन डेवीड' चा रोटरॅक्टचे स्टॅंप्सही अत्यंत आकर्षक होते. इराक, इस्राअल, इंडोनेशिआ या देशांचे सहसा न बघायला मिळणारे स्टॅंप्स या अंबरनाथच्या रोटरॅक्टच्या संग्रहात पहावयास सापडले.

या स्टॅंपप्रदर्शनाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे विएतनाम, मायगारा पोस्ट या देशाची ओळख करून देणारे असंख्य स्टॅंप येथे दिसत होते. 'शाहराज' या अपरिचित देशाचे अनेक स्टॅंप्सही या प्रदर्शनात उठून दिसत होते. १९७६ चा रुमानिआ येथील एका बेडकावर काढलेला स्टॅंपही सर्वांचेच लक्ष आपल्याकडे वेधून घेत होता. ऑस्ट्रेलियातील लोकजीवन, नेदरलँडचे विविध अनुभव व भारतातील स्टॅंप्समधून दिसणारे भारतीय विविधतेचे प्रकार, यामुळे प्रदर्शनाला उठाव आला होता.

टेबलटेनिसवर काढण्यात आलेला स्टॅंप हा क्रीडाप्रेमींना आकर्षित होता, तर फुलपाखरांवरचे विविध स्टॅंप्स हे सर्वांचेच लक्ष वेधून घेत होते. रोटरॅक्टचे कार्यकर्ते लोकांना प्रदर्शन कसे बघावे हे अत्यंत उत्साहाने सांगत होते व स्टॅंप्स ज्यांनी संग्रहित केले होते ते ही प्रेक्षकांची जिज्ञासा पुरवत होते.

श्री. अरविंद पेंडसे यांचे स्टॅंप्स हे प्रदर्शनाचे खास वैशिष्टय होते. त्यांनी काही अपवाद वगळता १९४७ ते १९८० मध्ये भारतात जितके म्हणून स्टॅंप्स निघाले ते सर्व लावले होते. भारतीय स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय घटनांवरचे पुस्तक लिहून जितके काम होणार नाही तितके या ५०० च्या वरती स्टॅंप्सच्या दर्शनाने होत होते. यात १९६७ मध्ये काढलेला नॅट विमानांचा विजयावरील स्टॅंप जसा आहे तसाच १९६५ चा लालबहाद्दुर शास्त्री यांचा स्टॅंपही प्रकर्षाने दिसत होता. त्याचप्रमाणे १९७१ चा काशी विद्यापीठाचा संवत्सरीचा स्टॅंपही विषयातील वैचित्र्य स्पष्ट करीत होता.

असे जरी असले तरी स्टॅंपबरोबर त्याची माहिती देणारे तक्ते लावले असते तर ते अधिक उपयुक्त झाले असते. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी सुनिल बापट, वसंत दातार इत्यादींनी फार परिश्रम घेतले. □

# श्रद्धांजली

## बाई, परत या !

बाई, तसं मरणं हा प्रकार तुम्हाला नवीन नव्हता आणि तुमचं तसं मरणं आम्हालाही आवडायचं, भिडायचं; नटसम्राटमधील सरकार असो, सोबतीमधील बायाजाबाई असो वा २२ जूनमधील चापेकरांची आई असो; तुमचं प्रत्येक मरण पाहताना कुरतडल्या जाणाऱ्या काळजाबरोबरच मेंदूत एक जाणीव सतत जागी असायची, तुम्ही या प्रयोगात, पुढच्या प्रयोगात, त्याच्या पुढच्या प्रयोगात आणि त्याच्या पुढच्या प्रयोगातही अशाच मरत राहणार आहात. हे मरणं तुमच्या दृष्टीनं डाव्या हातचा मळ बनून गेलंय; पण बाई, आज मात्र तुम्ही आम्हा सगळ्यांनाच फसवलंत ! तुमचं हे–हे नवीन मरण आम्हाला संपूर्ण अनोळखी अन् म्हणूनच संपूर्ण खोटं वाटतंय. वाटतं, वाटतं की, ज्या मरणानंतर संपूर्ण प्रेक्षागृहातून अनेक अस्फुट हुंदके बाहेर पडणार नाहीत,. अनेक अडलेले, कोंडलेले बांध फुटून वाहणार नाहीत, पडदा पडणार नाही आणि तुम्ही जणू काही घडलंच नाही अशा आविर्भावात उठून मेकअपरूममध्ये अदृश्य होणार नाही ते तुमचं मरण खरं नाहीच ! बाई, पण खोटं तरी कसं म्हणू ? हे सगळं घडलं, आजही घडलं; अनेक आसवं ओघळली, शेवटचा पडदा पडला, तुम्हीही मेकअपरूममध्ये गेलात; हे सारं अखेरचं घडलं, पुन्हा हे कधीही घडणार नाही ! पुन्हा आम्हाला समईच्या शुभ्रकळीसारखी जळणारी कावेरी दिसणार नाही, टाकीचे घाव स्वत.वर झेलून नवऱ्याचं देवपण जपणारी हिमालयाची सावली दिसणार नाही, वठल्या झाडाला पालवी फुटल्याप्रमाणं हिरवी म्हातारी बनूताई दिसणार नाही ! छे, हे असं मरणं तुम्ही जमवायला नको होतं.

बाई, आपल्या भूमिकांच्या निवडीबाबत तुम्ही अत्यंत जागरूक होतात. तुम्ही घडवलेल्या व्यक्तिरेखा, त्यांचे बारकावे, त्यांचं प्रेक्षकांच्या हृदयातलं स्थान या सगळ्यांनी आम्हालाही असंच वाटत होतं की, तुम्ही आव्हानात्मक भूमिका घेता आणि त्याही मर्जीनुसारच घेता; पण आज हे आमचं वाटणं तुम्ही शेवटच्या भूमिकेत खोटं ठरवलं. बाई, तुम्ही ही शेवटची भूमिका का घेतलीत? तुम्ही हे असं लादलेलं मरण का स्वीकारलंत ? अवघ्या विश्वाचं नाटक लिहिणारा तो नाटककार असेलही श्रेष्ठ; पण तुम्हाला पटत नसताना तुम्ही त्याला नाकारायला हवं होतं–स्वत:साठी नाही तरी आमच्यासाठी नाकारायला हवं होतं.

बाई, तुम्ही या रंगभूमीला भरपूर दिलंय. प्रत्येक रात्री, प्रत्येक प्रयोगात स्वत: मरून तिचं आयुष्य तुम्ही वाढवलं; पण अजून देण्यासारखं तुमच्याजवळ खूप होतं. तुमच्या अभिनयाचं मंतरलेलं पाणी पिण्यासाठी कित्येक चैत्रवेली आसुसलेल्या होत्या. मग बाई, आजच एवढी घाई कशाला करायला हवी होती ? मृत्यूनं तुमच्याकडं दान मागितलं; पण 'पुढचं वाढलेलं ताट द्यावं; पण बसायचा पाट देऊ नये माणसानं.' असं म्हणून तुम्ही त्याला नकार दिला असतात ना, तर तोही बिचारा आनंदानं विन्मुख परत गेला असता !

बाई, अजून खूप कामं तुमची वाट पाहताहेत. मोरवाडीचं घर दुरुस्त करायचंय, तुळशीवृंदावन बांधायचंय, अप्पांचा स्वेटर विणायचाय आणि हिमालयाचा आश्रम ? तुमची सावली नसली तर उन्हाच्या तडाख्यात भाजून निघेल तो !

आम्ही वाट पाहतो आहोत. बाई, परत या ! येताय ना ? ¤

## स्वप्नगाणे संपले....

घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याची काही तरी सोय हवी होती किंवा ठराविक वेळ अजिबात हरवूनच टाकायचा उपाय पाहिजे होता किंवा काय वाटेल ते पाहिजे होतं; पण काही करून काळावरचा हा ओरखडा टाळता यायला हवा होता !

खरं म्हणजे नुकतीच या स्वप्नगाण्याची सुरुवात झाली होती. या भरदार मैफिलीचा षड्ज आता कुठं आकार घेत होता. अत्यंत संपन्न देहयष्टी, सुंदर खर्जातील आवाज, विलक्षण भेदक डोळे आणि या जोडीला क्वचितच लाभणारी प्रगल्भ अभिनयाची साथ घेऊन जयराम हर्डीकरनं रंगभूमीवर जम बसवून चित्रपटांमध्ये नुकताच प्रवेश केला होता. चित्रपटामध्ये 'सर्वसाक्षी' हे त्याचं पहिलं पाऊल; पण त्याच्या नाटकांप्रमाणंच सर्वसाक्षीतील त्याचा रवी मास्तरही रसिकमान्यता मिळवून गेला होता. सर्वसाक्षीमधील पत्नीबरोबरचे हळुवार प्रणयप्रसंग जिवंत करणारा रवी, शाळेतील मुलांमध्ये

पृष्ठ २४ वर

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# रायाचे आठवावे गुण

शाके १९०२ चैत्रशुद्ध पौर्णिमा. हनुमानजयंती. स्वराज्यसंस्थापक परमपूज्य छत्रपती शिवाजीमहाराज यांची ३०० वी पुण्यतिथी !

किल्ले रायगडी पुण्यतिथीचा प्रचंड सोहोळा सिद्ध जाहला आहे. सोहोळचास जावे हा मानस; पण आमच्या भिषकवर्यांची अनुज्ञा नाही. तेव्हा शरिराने जरी आम्ही पुण्यनगरीत असलो तरी मनाने रायगडी राजांच्या पुतळचाशी आहोत. मनाच्या डोळचांनी आम्ही सोहोळा पाहात, राजांच्या चरित्राचे अवलोकन करीत संध्यासमय व्यतीत करीत आहोत.

¤

मनाच्या डोळचांनी प्रथम आम्ही रायगड पाहिला. हेन्री ऑक्झिडनसाहेबांनी तो आम्हाला दाखविला. इ. स. १६७४ साली ते रायगडावर गेले होते. ते म्हणतात, 'आम्हाला डोंगर चढून किल्ल्यात येण्याचा हुकूम आला. राजाने तिथे आमची एका घरात सोय केली होती. त्याप्रमाणे आम्ही पंचहारा सोडून दुपारी तीन वाजता किल्ल्याकडे जावयास निघालो आणि सूर्यास्ताच्या सुमारास त्या दुर्गम डोंगराच्या माथ्यावर येऊन पोहोचलो. हा डोंगर माणसापेक्षा निसर्गानेच दुर्गम केला आहे. वर जावयास त्याने सोपी वाटच ठेवली नाही. आपण वर पोहोचल्यावर दोन्ही बाजूना उंच तट आणि बुरूज असलेला एक चिचोळा दरवाजा आहे. बाकीच्या सर्व बाजूंनी डोंगराला उभे कडे आहेत....माथ्यावर आत पुष्कळ भक्कम इमारती आहेत. एक राजाचा दरबार व मंत्र्यांची घरे व इतर मिळून तीनशे तरी इमारती वर असाव्यात. माथ्यावरील सपाटीची लांबी अडीच मैल व रुंदी अर्धा मैल आहे; पण डोळे सुखावतील असे झाड, हिरवळ किंवा झुडुपे नाहीत. आम्हाला दिलेले घर राजाच्या राजवाडचापासून निदान मैलभर तरी असावे. अंधार पडत असता आम्ही तिथे सुखाने विसाव्यासाठी गेलो.

¤

ज्या असंख्य लोकांना दि. ३१–४–१९८० या दिवशी रायगडला जाता आले नाही त्यांच्यासाठी हे महाराजांच्या वेळचे खास वर्णन दिले आहे. अर्थात ३१-३ ला रायगडाला जाणारे कमी नव्हते. आदल्या दिवसापासून रायगडाकडे कूच करण्याच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. पुण्यात जिथे तिथे 'तुम्ही काय सोय केलीत ? रिझर्वेशन केले का ? तुमच्या बसमध्ये एखादी सीट आहे का ?' अशा चौकश्या ऐकू येत होत्या. आम्हाला टिळकरोडवर सहा सात सायकलस्वारांचा जथा भेटला. मी त्यांना कुठले म्हणून विचारले. ते बेळगावहून आणखी कुठे कुठे जाऊन आले होते. भोरला रात्री मुक्काम करून ते पुढे रायगडला जाणार होते. पंक्चर झालेली एक सायकल नीट करून घेण्यासाठी ते थांबले होते. त्यातले काही कॉलेज–विद्यार्थी होते. काही नोकरदार होते, पण सर्व बेळगांवात, एकाच गल्लीत राहणारे होते. मी प्रत्येकाशी हस्तांदोलन करून, त्यांना सुखाचा प्रवास चिंतिला आणि पुढे गेलो. महाराजांच्या तीनशेव्या पुण्यतिथीला रायगडावर जाणे मला शक्य नव्हते. या मुलांमुळे या पुण्यतिथीशी आपला काही तरी संबंध आला असे वाटून समाधान वाटले.

¤

दि. ३१–३–८० चा रायगडावरचा शिवाजीमहाराजांचा तीनशेवा स्मृतिदिन फारच जोरात झाला. अपेक्षेबाहेर यात्रिक आले. पन्नास हजार ! गडावर चढण्याची वाट अरुंद असल्याने तीन-तीनच्या रांगेत उतरताना पायघडचा घातल्याप्रमाणे उतरावे लागत होते. पिण्याचे पाणीही कमी पडले व एका ग्लासला १२ आणे-रुपया देऊन पाणी घ्यावे लागले. अपेक्षेबाहेर लोक आल्यावर होणाऱ्या सर्व गैरसोयी तिथे झाल्या आणि आपल्याकडे नेहमी होते त्याप्रमाणे सोहाळचाला फार महत्त्व आले. उदाहरणार्थ–शिवाजीमहाराजांच्या वेळी राज्यारोहणप्रसंगी पवित्र नद्यांतील तीर्थांची उदके आणून सोन्याच्या पात्रांतून त्यांच्यावर अभिषेक केला होता, म्हणून आता त्यांच्या स्मृतिदिनी तशीच उदके आणून अभिषेक करणे मला जरा अति वाटले. राज्यरोहणदिन व स्मृतिदिन या दोन निराळचा गोष्टी आहेत.

आज सर्व राजकारणे विसरून या महापुरुषाचे चरित्र गावयाचे. आठवणींची कथाकीर्तने झडावयाची. समारंभाच्या बडेजावात हे विसरले गेल्यामुळे अशा काही आठवणी मी सांगणार आहे. या आठवणी महाराजांच्या समकालिनांच्या आहेत. तसेच काही महाराजांच्या खुद्द हातच्या पत्रांतून घेतल्या आहेत.

शिवाजीमहाराज दिसायला कसे होते ? आपल्या बखरींमध्ये कुठे काही तशी नोंद नाही. कारण दिसण्याची वर्णने करण्याची आपली पद्धत नव्हती. महाराजांच्या वेळच्या भारतात व्यापारासाठी आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीच्या वेगवेगळचा ठिकाणच्या अधिकाऱ्यां-

मधील पत्रव्यवहारांतून ही माहिती आली आहे. एक ब्रिटिश अधिकारी लिहितो–

ज्यांनी शिवाजीला पाहिले आहे त्यांच्या वर्णनांवरून शिवाजी हा मध्यम उंचीचा, ताठ, अतिशय सुंदर शरीरबांधा असलेला, तरतरीत आहे. तो बोलू लागला की, त्याच्या तोंडावर स्मित झळकताना दिसते. त्याचे डोळे तीक्ष्ण आणि तेजस्वी आहेत. तो त्याच्या भोवतालच्या लोकांत अधिक गोरा आहे.

आरंभापासूनच शिवाजीमहाराजांना आपण स्वराज्य स्थापू याचा आत्मविश्वास होता हे त्यांच्या खालील पत्रावरून कळते. 'राजश्री दादाजी नरसप्रभु देशपांडे...यांसी प्रति शिवाजी राजे...तुम्हास मेहरबान वजिरांचा विजापूरहून हुकूम आला... त्यावरून तुमचे बाप नरसीबाबा हवालदील झाले...त्यास शहासी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाही, श्री रोहिरेश्वर तुमचे खोरियातील आदि कुलदेव, तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रिलगत स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिले व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे. त्यास बाबास हवाल होऊ नये जरूर सांगावे आणि तुम्ही तो (हुकुमाचा) कागद ताबडतोब आमचेकडे घेऊन येणे. राजश्री दादापंताचे विद्यमाने बाबाचे व तुमचे आमचे श्रीपाशी जे इमान झाले ते कायम वज्रप्राय आहे. त्यांत आम्ही व आमचे वंशज वंशपरंपरागत वतन वगैरे चालविण्यासी कमतर करणार नाही. हे राज्य व्हावे हे श्रींचे मनात फार आहे....बहुत काय लिहिणे.'

या पत्रावरून लोकांत आपल्याविषयी विश्वास राहावा म्हणून महाराज किती जागरूक होते हे कळतेच; पण संधी येईल तेव्हा 'हिंदवी स्वराज्याच्या कल्पनेचा त्यांचा प्रसार ज्याच्या त्याच्याशी चालू होता हेही कळते. पुढचे पत्र महाराजांचे स्वदस्तूरचे आहे. ते त्यांनी मोगलांच्या एका अधिकाऱ्यास लिहिले आहे. त्यातला निर्भिडसडेतोडपणा आपणास चर्चिलच्या एखाद्या पत्राची आठवण करून देतो. पत्र असे आहे,

'आज तीन वर्षे बादशहाचे मोठमोठे सल्लागार व योद्धे आमचा प्रदेश काबीज करण्यासाठी चालून येत आहेत, हे तुम्हा सर्वांस माहीत आहे. बादशहा हुकूम फर्मावितात, 'शिवाजीचे किल्ले व मुलूख काबीज करा!' तुम्ही जबाब पाठविता, 'लवकरच काबीज करितो' (पण) आमच्या या दुर्गम प्रदेशात नुसता कल्पनेचा घोडासुद्धा नाचविणे कठीण, मग तो प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला? भलत्याच खोट्या बातम्या बादशहाकडे लिहून पाठविण्यास तुम्हास लाज कशी वाटत नाही? कल्याणी व बेदरचे किल्ले उघड्या मैदानात होते ते आम्ही काबीज केले. आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ. नदीनाले उतरून जाण्यास वाट नाही. अत्यंत मजबूत असे साठ किल्ले आज माझे तयार आहेत. त्यापैकी काही समुद्रकिनाऱ्यावर आहेत. बिचारा अफझुलखान! जावळीवर फौज घेऊन आला व नाहक मृत्युमुखी पडला! हा सर्व प्रकार तुम्ही आपल्या बादशहास का कळवीत नाही? अमीर उल उमराव शाइस्तेखान आमच्या या गगनचुंबी डोंगरात व पाताळास पोहोचणाऱ्या खोऱ्यात तीन वर्षे सारखा खपत होता. 'शिवाजीचा पाडाव करून लवकरच त्याचा प्रदेश काबीज करतो' असे बादशहाकडे लिहून लिहून थकला! या खोडसाळ वर्तनाचा परिणाम त्याला भोवला, तो सूर्यासारखा स्वच्छ सर्वांसमोर आहे. आपल्या भूमीचे रक्षण करणे माझे कर्तव्य आहे आणि तुम्ही बादशहाकडे कितीही खोट्या बातम्या लिहून पाठविल्यात तरी माझे कर्तव्य करण्यास मी चुकणार नाही!'

इंग्लिशांच्या मुंबई वखारीकडून ईस्ट इंडिया कंपनीस गेलेल्या एका पत्रात शिवाजीमहाराजांविषयी परकीयांत काय मत होते हे कळते.

'पावसाळा संपता संपताच कोकणामधील आपले रायरीचे (रायगडचे आधीचे नाव) भक्कम स्थान सोडून, प्रबळ विजेता म्हणून कीर्ती मिळविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असलेला शिवाजीराजा, आपल्या वीस हजार घोडेस्वार व चार हजार पायदळ या सैन्यानिशी कर्नाटकमध्ये घुसला...सीझरप्रमाणे तो आला, त्याने पाहिले व तो जिंकीत गेला. असे हातोहात विजय मिळवीत त्याने सोने, हिरे, पाचू, माणके, प्रवाळ यांचे प्रचंड साठे मिळवून आपले हात आपल्या पुढील योजनांसाठी आणखी मजबूत केले. अलेक्झांडर दि ग्रेट याच्याहून दराऱ्याने यत्किंचितही कमी नसलेल्या या राजाने आपल्या पंखधारी सेनेच्या (त्यानेच आपल्या सैन्याला पक्षी हे नाव दिले आहे.) चपळाईने हालचाली करून केवळ आठ महिन्यांत मोगलांचे प्रबळ आठ किल्ले परत घेतले... आता हे किल्ले जिंकल्यावर दिल्लीला जाऊन


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| १. **अश्वत्थ :** ( कादंबरी ) योगिनी जोगळेकर | | रु. २५/– |
| २. **सर्वोत्कृष्ट मराठी कथा :** खंड ११ वा : संपादक : राम कोलारकर | | ,, २५/– |
| ३. **स्नेहयात्रा :** ( विनोदी कथा ) बाळ गांगल | | ,, २०/– |
| ४. **किल्ले :** गो. नी. दांडेकर | | ,, १०/– |
| ५. **एक अध्याय :** ( कादंबरी ) ज्योत्स्ना देवधर | | ,, १५/– |
| 1. **Cricket Rebel :** ( autobiography )–John Snow | | ,, 48.25 |
| 2. **Thurber Country :** ( Humour )–James Thurber | | ,, 14.75 |
| 3. **Crash Landing :** ( Bestseller–Novel on aviation ) | Mark Regon | ,, 17.50 |
| 4. **The Train Robbers :** ( Bestseller-story of the greatest Crime of the century ) | Piers Paul Read | ,, 23.95 |

* At Phoenix the books are under intensive care unit ! But they are not sick. They are throbbing and pulsating with clippings inside them. To give you knowledge. Information And pleasure !

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०.**

औरंगजेबाला तेथे वेढा घातल्यावरच आपण म्यानातून काढलेली आपली तलवार म्यानात घालू अशी शपथ त्याने आपल्या कुलदेवतेपाशी घेतली आहे!'

शिवाजीमहाराजांची सर्वांत हर्षद स्मृती म्हणजे त्यांचा राज्याभिषेक! त्यांच्या कर्तृत्वावरचा हा कळसच. सभासद बखरीत त्याचे हृदयंगम वर्णन आले आहे. तेही आज मनात येते. बखरीत म्हटले आहे, ' जडित सिंहासन सिद्ध केले. रायरीचे नाव रायगड ठेवले. तक्तास स्थल तोच गड नेमला. गडावरी तक्ती बसवावे असे केले. सप्तमहानदीयांची उदके व थोरथोर नदियांची उदके व समुद्राची उदके, तीर्थक्षेत्र नामांकित तेथील तीर्थोदके आणली. सुवर्णाचे कलश केले, सुवर्णाचे तांबे केले. आठ कलश व आठ तांबे यांनी अष्टप्रधानांनी राजियास अभिषेक करावा असा निश्चय करून सुदिन पाहून मुहूर्त पाहिला. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मासी शु॥ १३ स मुहूर्त पाहिला.... येणेप्रमाणे राजे सिंहासनारूढ झाले! या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशाह. मराठी बादशहा एवढा छत्रपती झाला, ही गोष्ट काही सामान्य झाली नाही!'

यानंतर फक्त सहा वर्षांनी महाराजांचा अंत झाला. प्रचंड उद्योगाने भरलेल्या जीवनाचा शेवट झाला! त्यांचे चरित्र वाचल्यावर आठवणी उरतात त्यांच्या प्रचंड हालचालींच्या. लढाया, हल्ले, संघटना, प्रेरणा देणे आणि स्वराज्य बांधणे. हा एक असा वीरपुरुष की ज्याचा कुणी पराभव करू शकले नाही. एखाद्या क्षणी त्यांनी माघार घेतली तरी ती जिंकण्यासाठी! या थोर पुरुषाचा पराभव फक्त मृत्यूने केला. सभासद बखर तो प्रसंग असा सांगते -

' मग काही दिवसांनी राजास ज्वराची व्यथा जाहाली. राजा पुण्यश्लोक, कालज्ञान जाणे. विचार पाहता आयुष्याची मर्यादा झाली असे कळून जवळील कारकून व हुजरे होते. त्यामध्ये सभ्य भले लोक बोलावून आणले...मग त्यांस सांगितले की, आपली आयुष्याची अवधी झाली. आपण कैलासास श्रीचे दर्शनास जाणार...शेवट आपला तो निदानसमय दिसत आहे. राज्य म्या शिवाजीने चाळीस हजार होनांचा सुपे महाल होता त्यावरि एक क्रोड होनांचे राज्य पैदा केले. हे गड कोट लष्कर पागा ऐसे मिळविले...

' येणेप्रमाणे राजे बोलिले- सर्वांचे कंठ दाटून नेत्रांपासून उदक स्रवू लागले. परम दुःख जाले. त्या उपरी राजे बोलले की, ' तुम्ही चुकुर होऊ नका. हे तो मृत्युलोकच आहे. यामागे किती उत्पन्न झाले तितके गेले. आता तुम्ही निर्मळ सुखरूप बुद्धीने असणे. आता अवघे बाहेर बसा. आता श्रीचे स्मरण करितो ! म्हणोनि अवघियांस बाहेर बसविले आणि राजियांनी भागीरथीचे उदक आणून स्नान केले आणि योगाभ्यास करून, आत्मा ब्रह्मांडास नेऊन दशद्वारे फोडून प्राण प्रयाण केले. शालिवाहन शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे, चैत्रशुद्ध १५ रविवारी दोन प्रहरी काळ रायगडी जाला...

' राजा साक्षात केवळ अवतारीच. जन्मास येऊन पराक्रम केला. नर्मदेपासून रामेश्वरपर्यंत द्वाही फिरली. देश काबीज केला. अदलशाही, कुतुबशाही, निजामशाही, मोंगलशाही या चारी पातशाह्या व समुद्रातील बेवीस पातशहा सिंहासनाधीश छत्रपती जाहला. प्रतिइच्छा मरण पावून कैलासास गेला. ये जातीचा कोणी मागे जाहला नाही, पुढे होणार नाही!'

¤

बखरींमधील असल्या तरी तीनशे वर्षांपूर्वीच्या या आठवणीच म्हणावयाच्या. आज शिवाजीमहाराजांच्या तीनशेव्या स्मृतिदिनानिमित्त त्या मनात आणल्या आणि बरे वाटले. तसेच वाचकांनाही या गुणी राजाचे चरित्र आठवून बरे वाटेल.

□

# जनतापक्ष

## एका शोकांतिकेचा बोध

वा. दा. रानडे

जनसंघीयांच्या मेळाव्यात नवीन पक्ष काढण्याचा निर्णय घेण्यात आला. भारतीय जनतापक्ष असे त्याचे नाव राहणार असून त्याच्या अध्यक्षपदी अटलबिहारी वाजपेयींची निवड झाली आहे. जगजीवनबाबूंनी त्यापूर्वी भरलेल्या आपल्या गटाच्या मेळाव्यात आपलाच खरा जनता पक्ष असा दावा केला आहे. जनता पक्षाच्या सभासदांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दैनंदिन कार्यात भाग घेता येणार नाही असा निर्णय पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने १७ विरुद्ध १४ मतांनी घेतला. या निर्णयाच्या बाजूने बहुमत असले तरी ते फार मोठे नाही. रा. स्व. संघाशी संबंधाचा प्रश्न महत्त्वाचा न मानता या मंडळींशी जमवून घ्यावे असे पक्षातल्या एका मोठ्या गटाला वाटत होते; पण पक्षाचे विघटन टाळण्यात त्याला यश आले नाही. कार्यकारिणीचे निर्णयानंतर अध्यक्ष चंद्रशेखर व तीन सरचिटणिसांनी आपल्या पदांचे राजिनामे दिले; पण त्यांना तात्पुरते काम पाहण्यास सांगण्यात आले. उर्वरित जनतापक्षात आता कोण राहिले? संघटना कॉंग्रेसचा गट, काही समाजवादी. खरा जनता पक्ष कोणता यावर ही तिन्ही शकले खुशाल वाद घालोत. जनता या तिन्ही शकलांच्या बाहेरच असून तिच्या दृष्टीने जनता पक्ष संपला आहे.

जयप्रकाशजींच्या प्रेरणेने मोठ्या अपेक्षेने स्थापन झालेल्या जनता पक्षाची तीन वर्षांच्या आतच अशी शोकांतिका का व्हावी? हा प्रयोगच मुळात चुकीचा होता का? की योग्य पद्धतीने तो न राबविल्याने फसला?

राजकीय पक्षांच्या बोधणीच्या दृष्टीने त्यापासून काय बोध घ्यावयाचा? जनता पक्षाचे कार्यकर्ते याचा अंतर्मुख होऊन विचार करणार आहेत का? की एकमेकांवर दोषरोपांचेच सत्र ते चालू ठेवणार आहेत?'

विरोधी पक्षांनी आपल्या वेगळ्या राहुट्या ठेवून केवळ निवडणुकीपुरती आघाडी केली तर तेवढ्याने देशात काँग्रेसला प्रभावी पर्यायी शक्ती निर्माण होणार नाही. या पक्षांनी आपल्या वेगळ्या अस्तित्वाचे विसर्जन करून एकसंध पक्ष स्थापण्यानेच असा प्रभावी पर्याय निर्माण होईल असे जयप्रकाशजींना वाटत होते. भिन्न विचारप्रणाली असलेले हे पक्ष एकत्र कसे काम करू शकतील? काँग्रेसविरोधाशिवाय त्यांच्यात समान काय आहे? अशा शंका पक्षस्थापनेच्या वेळी काही विचारवंतांनी घेतल्या होत्या. जनता पक्षाच्या स्थापनेमागे केवळ निवडणुका जिंकून सत्ता हाती घेण्याचा उद्देश असू नये असे मत पक्षस्थापनेच्या वेळी लिहिलेल्या एका लेखात मी व्यक्त केले होते. त्या लेखात मी म्हटले होते, 'नवा पक्ष स्थापन करताना केवळ निवडणुकीची दृष्टी नसावी. विधिमंडळातील कार्य, विधिमंडळाबाहेर विधायक कार्य आणि जनतेवर होणाऱ्या अन्यायाच्या निवारणासाठी शांततापूर्ण संघर्ष असे तिहेरी कार्य नव्या पक्षाने हाती घ्यावयास हवे. आमचे राजकारण निवडणुकप्रधान व सत्ताभिमुख झाले असून त्यासाठी संधिसाधू समझोते व करार केले जातात. विधिमंडळातील कार्यापेक्षाही बाकी दोन कार्यक्षेत्रे अधिक महत्त्वाची मानून त्यास वाहून घेणारे कार्यकर्ते ज्या पक्षाजवळ असतील तोच कालांतराने जनतेचा पाठिंबा मिळवून प्रभावी पक्ष बनू शकेल. या लांब पल्ल्याच्या मार्गानेच आपणास जावे लागणार आहे. (माणूस २२ जानेवारी १९७७).

जनतापक्षाच्या स्थापनेमागील अडचणींची जयप्रकाशजींना कल्पना नव्हती असे म्हणता येणार नाही; पण योग्य नेतृत्व मिळाल्यास त्यातून मार्ग काढाता येईल असे त्यांना वाटत होते. प्रमुख विरोधी पक्षांचा एकच पक्ष स्थापण्याची कल्पना तर जनतेला एकदम पसंत पडली. तीस वर्षे सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाच्या मक्तेदारीस ती विटली होती; पण ही मक्तेदारी कशी संपवायची याचा मार्ग तिला सापडत नव्हता! काँग्रेसची जागा घेण्यास समर्थ असा पर्यायी पक्ष तिला दिसत नव्हता. जनतापक्षाच्या रूपाने असा पक्ष स्थापन झाल्याचे दिसताच तिने त्याला एकदम सत्तास्थानावर नेऊन बसविले.

आणि एकदा सत्ता मिळाल्यावर सत्तारूढ पक्षात येतात ते सारे दोष जनता पक्षात आले. सत्तेच्या राजकारणातच कार्यकर्ते अधिकाधिक गुरफटत गेले. विधायक कार्य, जनतेवरील अन्याय निवारण्यासाठी शांततापूर्ण संघर्ष ही कार्ये तर बाजूलाच राहिली; पण पक्षसंघटनेच्या व शिस्तबद्ध पक्ष उभारणीच्या कार्याकडेही दुर्लक्ष झाले. पक्षाची रीतसर सभासद नोंदणी, खालपासून वरपर्यंत पक्षशाखांच्या व समित्यांच्या निवडणुका अशी पद्धतशीर पक्षबांधणी झालीच नाही. सुरुवातीस नेमलेल्या अस्थायी समित्याच काम करीत राहिल्या. सभासद नोंदणीत जनसंघ कार्यकर्त्यांनी अधिक रस घेतला. रा. स्व. संघ स्वयंसेवकांच्या मदतीने त्यांनी मोठ्या प्रमाणावर सभासद नोंदणी केली. आपण त्यामानाने काहीच काम केलेले नाही याची जाणीव इतर घटकांना झाली. पक्षाच्या निवडणुका झाल्यास सूत्रे जनसंघाच्या हाती जाणार असे स्पष्ट दिसू लागले. तेव्हा जनसंघाने बनावट सभासद नोंदणी मोठ्या प्रमाणावर केली असा आरोप करून निवडणुकांचा पटच त्यांनी उधळून लावला आणि अध्यक्ष चंद्रशेखर यांनी या प्रश्नावर खंबीर भूमिका घेतली नाही. सभासद नोंदणीबाबत जेथे तक्रारी असतील तेथे निरीक्षक पाठवून किंवा याद्यांची छाननी करून त्या दूर करता आल्या असत्या; पण त्यांनी तसे काही केले नाही. निवडणुकांचे वेळापत्रक अनेकदा पुढे ढकलण्यात आले.

घटक पक्षांनीही खऱ्या अर्थाने विसर्जन न करता आपला वेगळेपणा आणि पक्ष आपल्या प्रभावाखाली आणण्याच्या हालचाली चालू ठेवल्या. यातूनच घटकवाद व अंतर्गत संघर्षाच्या चक्रात पक्ष सापडला. तो शेवटपर्यंत त्यातून बाहेर पडला नाही आणि अखेर घटकवादानेच त्याचा बळी घेतला. पक्षाच्या एकजुटीपेक्षा पंतप्रधानपद मिळविणे ही वैयक्तिक महत्त्वाकांक्षा चरणसिंगांसारख्या नेत्यांना अधिक महत्त्वाची वाटली. जनता पक्षाला जनतेचा पाठिंबा कमी का होत आहे व त्यातून मार्ग काय याचे चुकीचे विश्लेषण मधु लिमये यांच्यासारख्या समाजवादी नेत्यांनी केले. १९८२ च्या निवडणुका जिंकायच्या असतील तर जनसंघाला वगळून जनता पक्षाची पुनर्घटना करायला हवी असे त्यांना वाटू लागले. दुहेरी सदस्यत्वाचा प्रश्न त्यांनी याच उद्देशाने धसास लावला. जनसंघाला वगळूनही बाकीचा जनता पक्ष सत्ता टिकवू शकेल, निवडणुका जिंकू शकेल असे गणित त्यांनी मांडले; पण हे गणित चुकले. जनता पक्षाची सत्ता गेली, चरणसिंगांना अल्पकाळ पंतप्रधानपद उपभोगायला मिळाले, पण जनता पक्ष फुटल्याचा खरा फायदा इंदिरा गांधींना मिळून त्यांना पुन्हा सत्तेवर येण्याची संधी मिळाली. तीन वर्षांच्या आतच जनता पक्षाचे तीन तुकडे झाले. एकाधिकारशाहीचा धोका वाढला असून लोकशाहीवादी शक्ती विघटित, विस्कळित व दुबळ्या झाल्या आहेत. त्यांना एकत्र आणून प्रभावी आघाडी पुन्हा कशी उभारावयाची हे लोकशाहीवाद्यांपुढे आव्हान आहे.

□

# वगाड (१३)

# एक मुडदुश्या चित्रपट

बघ्या

यावंत, यावंत अण्णासाहेब ! गेल्या निवडणुकांनंतर आज पहिल्यांदाच इतक्या धन्यता-भरल्या चेहऱ्याने माझ्याकडे येताना तुम्हाला मी पाहतोय्. जनता पक्षरूपी पूतनेचे पंचप्राण प्राशून तिच्या निश्चेतन कलेवारापासून बाळकृष्णाच्या आवेशाने जनसंघ दूर होणार या बातमीने तर तुम्हाला ही धन्यता वाटत नाही ना ? असले काही रूपक दक्ष–आराम संघटनेच्या परिसरात घोळले जात असल्याचे ऐकतो. की, तुम्ही रायगडाला गेला होतात आणि छत्रपतींच्या वसतीने पवित्र झालेल्या त्या दुर्गेश्वराच्या दर्शनाने तुम्हाला वाटलेल्या धन्यतेतच तुम्ही आजवर बुडचा मारत आहात ? किंवा असंही असेल की गेले तीन–चार महिने अडून राहिलेलं पेन्शन या इयर–एंडिंगच्या घाई–गडबडीत बँकेत जमा करण्यात आल्याचं तुम्हाला कळलं असेल.

ए, तुझा हा धबधबा थांबव पाहूं.

अहो, पण आता या वयात तुम्ही हा एवढा उंच जिना एक-एक पायरी गाळून चढायला लागलात, तर त्याला तसंच काही कारण असणार, असं वाटणारच की नाही ? मी आपला एक एक अंदाज करायला लागलो.

पण तुझे सगळे अंदाज साफ चूक आहेत.

म्हणजे, अजूनही मिळालं नाही तुम्हाला तुमचं पेन्शन ?

पेन्शनचं काय घेऊन बसलास्. अरे, त्या पेन्शनच्या रकमेत आता आमच्या कुटुंबाची महिन्याची साखर काही बसत नाही. मुलगा लागलाय गेल्या वर्षापासून नोकरीला म्हणून भागतय् आमचे. ते पेन्शन मिळाले काय अन् मिळाले काय, फारसा फरक नाही. रायगडविषयी म्हणशील, तर बाबा रे, रामचंद्राने सीतेला अग्निदिव्याऐवजी रायगडावर जाऊन यायला सांगितले असते, तर तिने आनंदाने स्वतःहून वनवास पत्करला असता. त्या तळपत्या उन्हात माझ्या घशाला पडलेली कोरड अजून जात नाही. जरा पाणी आणायला सांग पाहू थोडे.

मग सांगा बघू कसल्या कौतुकाने तुमचा चेहरा असा ओथंबून चालला आहे ?

आजची बातमी वाचलीस ना तू ? 'बावीस जून' या सिनेमाला. एकूण चाळीस हजार रुपयांची बक्षिसे मिळाल्याची ! फार आनंदाची गोष्ट झाली बघ. परवाच मी जाऊन आलो त्या सिनेमाला. जेमतेम निम्मं थिएटर भरले होते. आपल्या लोकांना चवच उरली नाही कशाची ! माझ्या मनात तेव्हाच विचार आला की, या जोडप्याने चापेकरांवर चित्रपट काढला खरा; पण बिचारी दोघे कर्जाच्या खाईत पडणार !

अहो अण्णासाहेब, तुम्हाला नसतीच काळजी. भगवन्ताने पूर्वीच सांगून ठेवलंय. 'न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिम् तात गच्छति' चला, या बक्षिसातच सगळा खर्च भरून निघाला असेल सिनेमा काढण्याचा ! आता लोक पाहोत किंवा न पाहोत.

### न मानलेले ऋण

काय म्हणतोस ? इतक्या थोडक्यात झाले असेल हे काम ?

हे पहा अण्णासाहेब, मला सिनेमातले काय कळतेय, म्हणून त्याच्या खर्चाविषयी मी अंदाज करावेत ? पण चित्रपट पाहून माझे असे स्पष्ट मत झाले की, गावच्या मरीआईच्या देवळाच्या भिंतींवर बऱ्यापैकी हौशी चित्रकाराने गेरूने रामायण-महाभारत रंगवावे तशापैकी हा चित्रपट आहे. आपल्याला रामायण–महाभारत माहीत असते म्हणून ती चित्रे पाहून आपण अंदाज करू शकतो की, अरेच्या, इथे मारुती सीतेला खुणेची अंगठी दाखवतोय बरं का. तसे ज्यांनी आमच्या वि. श्री. जोश्यांचे चापेकरबंधूंवरचे पुस्तक वाचले असेल, त्यांना साधारण अंदाज करता येईल की, अरेच्या, इथे रँडला मारण्याचे काही तरी चाललेले दिसतंय. बस्स. इतकेच. या फिल्ममुळे कोणाला 'कंठस्नान आणि बलिदान' हे पुस्तक वाचावेसे वाटले तर उत्तमच होईल !

पण संपूर्ण चित्रपटात जोश्यांच्या पुस्तकाचा उल्लेखही नाही !

तेच तर खटकले मला. सगळा चित्रपट जोश्यांच्या त्या अद्वितीय ग्रंथावर बेतलेला आहे, अगदी बारक्या तपशिलासकट आणि तरी त्यांचे ऋण काही कुठे मानलेले नाही ! जिथे त्यांनी 'कंठस्नान आणि बलिदान' नीट वाचलेले नाही तिथे नेमक्या चुका झाल्या आहेत.

हे मात्र नवंच काढलंस हं. सांग बघू कुठे ते.

अगदी साधे शुद्धलेखनच घ्या ना. सुरुवातीला आणि शेवटी चापेकरांनी वडलांना पाठवलेल्या पत्रातील उतारा घेतला आहे. त्या दोन्ही ठिकाणी 'अंतकाल' हा शब्द 'अंत:काल' असा चुकीचा लिहिला आहे.

हे अगदीच क्षुल्लक झाले.

दुसरे म्हणजे त्यांतला ब्रुइन, पोलिससुपरिंटेंडेंट, 'हुतात्मा' हा शब्द वापरतो. वास्तविक, हुतात्मा हा शब्द चापेकरांच्या वेळेस मराठीत नव्हता. त्या काळी हुतात्म्यांना 'देशवीर' किंवा 'देशभक्त' हा शब्द लावीत. हुतात्मा हा अर्थवाही शब्द सावरकरांनी निर्मिला. मराठी भाषेवर स्वातंत्र्यवीरांनी केलेला तो अपूर्व संस्कार आहे; पण एकूण क्रांतिकारकांविषयी, त्यांतल्या अत्याचारी अंशापलीकडे काही आस्था नसल्याने अशा चुका होणे साहजिक आहे.

हे पहा, असा कीस काढायचा ठरवला तर कोणताच सिनेमा टिकणार नाही. मी म्हणतो, चापेकरांचा निधडेपणा, निश्चय, परकी सत्तेविषयीचा तिरस्कार आणि तिडिक या गोष्टी या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनावर बिंबतात की नाहीत ? मग खूप झाले. आजच्या दिवसात कोण चापेकर, कोण

सावरकर अन् कोण कान्हेरे ! त्यांची आठवण या तरुण मंडळींनी जागवली हे काय थोडं झालं ? त्याचं कौतुक सोडून ही साखरेची सालं काय काढत बसलास ?

## तुटपुंजा चित्रपट

अण्णासाहेब, या सगळ्या गोष्टी मला मान्य आहेत. सध्याच्या अवघड स्थितीत अशा आडवाटेला जाऊन चित्रपट काढण्याबद्दल जी काही शाबासकी द्यायची आणि धन्यवाद द्यायचे ते देऊन झाल्यावर आपण या सिनेमाचा विचार करू लागलो की आपल्याला जाणवतं ते हे की, हा चित्रपट नव-कवितेसारखाच दुर्बोध झाला आहे आणि त्यामुळे तो साधारण प्रेक्षकांपर्यंत पोचणं अवघड आहे; आणि असं असेल तर चापेकरांच्या हौतात्म्याची जाणीव हेमामालिनी आणि अमिताभ बच्चन यांच्यामागे धावणाऱ्या प्रेक्षकांना करून देण्यात तो कितपत यशस्वी ठरेल ? केवळ कलात्मक आणि उच्चभ्रू प्रेक्षकांसाठी मर्यादित प्रयोग असंच या फिल्मचं स्वरूप असेल तर क्रांतिकारकांची आणि ओजस्वी इतिहासाची आठवण जागती ठेवणारा चित्रपट म्हणून त्याचं कौतुक करता येईल का ? बरं, कलात्मक आणि उच्च पातळीवरचा चित्रपट म्हणजे काय ? जे नाटकात दाखवता येईल तेच चित्रपटात दाखवलं की चित्रपटाची पातळी वर जाते की काय ? आणि मुख्य म्हणजे चित्रपटाची जी ढब तुम्ही वापरता ती त्या कथेला शोभणारी हवी की नको ? असे नाना प्रश्न हा चित्रपट पाहिल्यावर आपल्यापुढे उभे राहतात.

तुला नक्की काय म्हणायचं आहे ?

मला म्हणायचंय् ते असं की, हा चित्रपट जे साधण्यासाठी काढला असावा असं तुम्हा-आम्हाला वाटतं ते तो साधू शकला नाही आणि याचं मुख्य कारण म्हणजे त्या चित्रपटाचा साचा.

हे पाहा, चापेकरांसारख्या हुतात्म्यांवरील चित्रपटानं काय साधायला हवं ? हेच ना, की देशावर अलोट प्रेम करावं, प्राण पणाला लावावेत, अत्याचारी उर्मट परकी सत्ताधीशांशी लढताना सर्वस्वाचं बलिदान करावं अशी शिकवण त्यातून मिळावी. या चित्रपटात दामोदर चापेकराची हौतात्म्याची इच्छा पहिल्यापासून त्याच्या अभिनयातून दिसतेच की. बाळकृष्णाचा एकाकी, वैराण प्रदेशातील अज्ञातवास त्या भिंतीला लगटून उंचावर गेलेल्या भयाण जिन्यामुळे कसा काळजाला जाऊन भिडतो आणि तो सूडाच्या भावनेने पेटून उठलेला बेछूट वासुदेव ! आपण तर बेहद्द खूष आहोत त्याच्यावर ! आणखी काय पाहिजे तुम्हाला ?

अगदी बरोबर बोललात अण्णासाहेब ! दामोदरचा निश्चय, बाळकृष्णाची संकटसहिष्णुता आणि वासुदेवाची तारुण्यसुलभ बेछूट वृत्ती या गोष्टी दाखविण्यात चित्रपट यशस्वी झालाय् हे मान्य करायला हवं; पण त्याचबरोबर हे ध्यानात घ्या की, चापेकरांची कथा आजही तुम्हा-आम्हाला जवळची वाटते-किंवा वाटायला हवी याचं कारण केवळ त्यांचं हौतात्म्य इतकंच नाही. एका सार्वत्रिक असंतोषाचं, अवघ्या समाजाला व्यापून राहिलेल्या प्रक्षोभाचं चकित करणारं दर्शन त्यांनी एका उर्मट, अप्रतिहत आणि अकुतोभय सत्तेला घडवलं. चापेकरांच्या क्रांतिकारी कृत्याचा हा पैलू आज आपल्या दृष्टीने महत्त्वाचा आहे आणि तो या चित्रपटात बहुतेक दुर्लक्षिला गेला आहे. त्यामुळे चापेकरांची कहाणी फार तर चापेकर कुटुंबियांच्या इतिहासातील एक उग्र–भीषण नाट्य म्हणून आपल्यासमोर येते. त्या काळाचा, त्या समाजाचा आणि परकी सत्तेविरुद्ध चाललेल्या सर्वंकष लढ्याचा एक भाग म्हणून ती आपल्यासमोर येत नाही. त्यामुळे चित्रपट कलात्मक वगैरे होत असेल कदाचित्; पण तुटपुंजा, त्रोटक आणि संदर्भहीन वाटतो. 'कंठस्नान आणि बलिदान' या पुस्तकात चापेकरांची कथा जशी भरघोस होऊन वाचायला मिळते, तशी ती या सिनेमात पाहायला मिळत नाही ही निराशा करणारी गोष्ट आहे.

## चापेकरांना लहान केले

हे थोडंफार खरं आहे. १८९३ साली हिंदु–मुसलमानांचे दंगे झाले, ९६ साली भीषण दुष्काळ पडला आणि ९७ साली प्लेग आला. प्लेगमुळे जो कहर गुदरला होता त्याचं अगदीच उथळ चित्र या सिनेमात पाहायला मिळतं. खरं पाहता प्लेगच्या भयंकर दिवसांच्या हकीकती लोक अनेक वर्षं घोळवत होते. आपटयांनी 'दिवस असे होते' या नावाची कादंबरी देखील त्या काळावर लिहिली आहे. मुंबई टाइम्सचा त्या वेळचा संपादक रीड याने लिहिले आहे की, 'संध्याकाळच्या वेळी जळत्या चितांचा लालपिवळा रंग क्षितिजावर उमटे आणि धुराने आसमंत कोंडून जाई !" नेव्हिनसनच्या पुस्तकात प्लेगच्या दिवसांतील पुण्यातला रस्ता म्हणून एक फोटो दिला आहे, तो पाहूनसुद्धा ते दिवस कसे भयाण होते याची कल्पना येते. हा सर्व भाग चित्रपटात तितक्या तीव्रतेने उतरला नाही हे खरे आहे.

चित्रपटात दैवी आपत्तीमुळे आणि त्यांना मिळालेल्या सरकारी अत्याचारांच्या जोडीमुळे समाजात खदखदणारा असंतोष जसा दिसत नाही तसा इंग्रजी सत्तेचा उन्मादही दिसत नाही. सिनेमातले एक पात्र चापेकरांना म्हणते देखील की, 'रँडने प्लेग काबूत आणला आणि आता तुम्ही त्याचा खून कशासाठी करता आहात ?' सिनेमा पाहिल्यानंतर, चापेकरांचा इतिहास सविस्तर माहीत नसलेल्या प्रेक्षकांचं असंच मत होतं की, रँड किंवा इतर इंग्रज अधिकारी त्यांचा खून करावा इतक्या थराला काही गेलेले नव्हते ! चापेकर मंडळीच प्रतिगामी आणि सनातनी ब्राह्मण्याचा पीळ असलेली होती. त्यांनी प्लेगच्या धामधुमीत झालेल्या गैरप्रकारांचा उगाच बाऊ केला आणि दोघा माणसांचा बळी घेतला ! कारण चापेकरांनी रँडचा खून केल्यानंतर समाजाला जो आत्मप्रत्यय आणि अन्यायाचा बदला घेतला जातो याचा अभिमान वाटला तो चित्रपटात कुठेच दिसत नाही. किंबहुना सामान्य समाजाचं अस्तित्व चालू घटनांविषयी त्याच्या प्रतिक्रिया, यांचं भानच चित्रपटानं ठेवलेलं नाही.

पण चित्रपटानं काय दाखवलं नाही याची चर्चा करण्यापेक्षा काय दाखवलंय ते पाहायला नको का ?

पण जे दाखवलं नाही त्यामुळे चापेकरांना लघुत्व येत असेल आणि त्यांचं हौतात्म्य डागिळ होत असेल तर तो दोष मानला पाहिजे की नको ? समाजात सतत चार-पाच वर्षं खदखदत असलेल्या असंतोषाचा उद्रेक अशा दृष्टीने रँडच्या हत्याकांडाकडे पाहण्याऐवजी एका प्रतिगामी; पुनरुज्जीवनवादी आणि सनातनी ब्राह्मणाने आधुनिकता आणणाऱ्या परकीय सत्तेवर मनस्वीपणे केलेला हल्ला असे रूप त्याला चित्रपट देत असेल तर हा विपर्यास आहे असे म्हटले पाहिजे की नको ?

पृष्ठ २१ वर

# शृंखला पायी असू दे, मी गतीचे गीत गाई

## नागपूरचे तीन दिवसांचे विषमता निर्मूलन शिबिर

समतेच्या चळवळीत काम करणारे महाराष्ट्रातील कार्यकर्ते दरवर्षी एकत्र जमतात अनुभवांची आपसात देवाण-घेवाण करण्यासाठी. यापूर्वी पुणे आणि लातूर येथे अशी शिबिरे भरली. सासवड येथील एक गाव-एक पाणवठाशिबिर व समताचळवळीची दिशा ठरविण्यासाठी पुण्याच्या गोखले इन्स्टिटयूटमध्ये जमलेली मंडळी हे सर्व हिशोबात धरले तर हे पाचवे शिबिर. एरवी तिसरेच. वीस ते तेवीस मार्च ( १९८० ) पर्यंत नागपूरमध्ये संपन्न झाले. २० मार्च हा महाड-सत्याग्रहाचा स्मृतिदिन.

२० मार्चला नियोजित उद्घाटक औरंगाबादचे प्राचार्य राजाराम राठोड येऊ शकले नाहीत. त्यांच्याऐवजी नागपूरमधील दलित समाजात जन्मलेल्या व संस्कृतच्या प्राध्यापिका असलेल्या कुमुद पावडेंनी हे स्थान भूषविले. श्री. अशोक थूल यांनी प्रास्ताविक केले. उमरेडचे सत्यशोधक ज्योति कोटमकर यांच्या–

" गर्जा जयजयकार, भिमाचा गर्जा जयजयकार,
मानवतेच्या शांतिदूताचे स्वप्न करा साकार । "

या स्वागतगीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. स्त्री-मुक्ति-संघटनेच्या प्राध्यापिका रूपा कुलकर्णी यांनी श्री. बाबा आमटे यांचे गीत म्हटले.

शृंखला पायि असू दे । मी गतीचे गीत गाई ।।

१२० गाळ्यांमधील हॉल तुडुंब भरला होता. पाच-सहाशे श्रोते होते. त्यापैकी अडीचशे बाहेरगावांहून आलेले कार्यकर्ते. प्राध्यापक वडसकर, प्रा. यशवंत मनोहर, प्रा. कुमुद पावडे व बाबा आढाव व्यासपीठावरील खुर्च्यांवर बसलेले. सामाजिक समता परिषदेचे श्री. बाबा दळवी कधी खुर्चीत तर कधी श्रोत्यात. ( माजी खासदार मृणाल गोरे श्रोत्यांमध्ये उपस्थित. माजी आमदार कुमार सप्तर्षी, एकनाथ साळवे हे देखील दुसऱ्या दिवशी श्रोत्यांतच दिसले. )

कुमुद पावडेंनी शिबिरातील उद्घाटनाचे भाषण केले. त्या म्हणाल्या– या देशात लिंग, वय, वर्ण, वर्ग या साऱ्या क्षेत्रात उच्च-नीचता मानली जाते. या सर्वंकष विषमतेला सांस्कृतिक आधार आहे. इथला हिंदूधर्म विषमतेचा पुरस्कार करतो. शोषणाचे इथे उदात्तीकरण होते. ब्राह्मणजातीला नावे ठेवीत सर्वच जातींनी ब्राह्मण्य जोपासले आहे. इथल्या मुस्लिम व ख्रिश्चन धर्मातही जात शिरली. जोपर्यंत जात खिळखिळी होत नाही तोपर्यंत कुठलाही इझम (Ism) उपयोगी ठरणार नाही. स्त्रीने इथली संस्कृती व परंपरा यांचे रक्षण केले. कम्युनिझमच तोंडे बंद करतो असे नाही. इथली बाईही बोलू शकत नाही. सर्व अन्याय निमूटपणे सहन करून तोंड बंद ठेवणाऱ्या स्त्रीस ' खानदानी ' समजले जाते. शहरी स्त्री सुशिक्षित आहे; पण तिच्या जाणिवा शून्य आहेत. साईबाबा, अंगारा यामागे ती लागली आहे. बलात्कारासंबंधी मथुरा केसचा उल्लेख करून इच्छा नसेल तर संभोग वेश्येवरही लादू नये, स्त्री ही केवळ भोगवस्तू आहे असे पुरुष मानतात व म्हणूनच बलात्कार होतात असे त्यांनी मांडले. स्त्रियांची सवतीची डोकेदुखी बाबासाहेबांनी नाहीशी केली. स्त्रीला वारसदार केले. आपल्या पायावर उभे राहण्याची ताकद फुले, आंबेडकरांनी दिली, कम्युनिस्टांनी नाही असे सांगून त्यांनी आपले भाषण संपविले.

अभिजात साप्ताहिकाचे प्राध्यापक यादवराव वडसकर यांनी विषमतेच्या सर्व अंगांवर हल्ला हवा असे आग्रही मत मांडले. या संपूर्ण कार्यक्रमात जातींमध्ये लग्न करण्याला कायद्याने बंदी हवी अशीही मागणी त्यांनी मांडली.

### टोकाची विधाने

प्रा. यशवंत मनोहर यांनी कर्मविपाकाचा सिद्धान्त अव्हेरल्याशिवाय, अध्यात्म व चैतन्यवादी तत्त्वाचा त्याग केल्याशिवाय विषमतानिर्मूलनाची भाषा फजूल आहे असे मत व्यक्त केले. चार्वाक, फुले, बुद्ध या सर्वांनी हाच मार्ग अंगीकारला होता. केशवसुतांनी तर

देव कशाचे अश्रू जे पिती । पाय-ताणत्या हाणा सांप्रति ।।

असे म्हटले होते. आगरकरांनी वेद चुलीत टाका व देव जाळून टाकायचा संदेश दिला होता. राम वनवासात गेला तर त्याचे महाकाव्य होते; पण आदिवासी आज अनेक वर्षे वनवास भोगतो आहे त्याबद्दल कोणी काही लिहीत देखील नाही व त्याची कुणाला लाज देखील वाटत नाही. कर्मविपाकवादी व विरोधी असे दोनच वर्ग या देशात आहेत असे टोकाचे विधान त्यांनी केले.

त्यानंतर नेताजी राजगडकर हे यवतमाळचे आदिवासी कार्यकर्ते बोलले–डाव्या चळवळी अपयशी होत आहेत व गेल्या ३-४ वर्षांत उठावही होत आहे. शेतकरी मजुराच्या मनात विस्फोट आहे, त्याच्या आशा-आकांक्षा रस्त्यावर आल्या आहेत. सर्व सांसदीय संस्था लिलावात काढण्यालायक झाल्या आहेत. प्रा. मनोहर म्हणतात त्याप्रमाणे वर्ग नाकारून भागणार नाही. केवळ सुशिक्षितांच्या चर्चेतूनही काही निघणार नाही. राष्ट्रीय चारित्र्यनिर्मितीसाठी शिक्षण द्यावे. अंधश्रद्धा उखडून टाकल्याशिवाय क्रांती झाली तरी ती टिकणार नाही. बिहारमध्ये किंवा जेथे बेलची, पारसबिघा, पिपरा घडते तिथे असे शिबिर भरविले असते तर जमीनदार बंदुकी घेऊन आले असते आणि भाषण करणारे पळून गेले असते. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात मोकळे वातावरण आहे त्याचा फायदा घेऊन नवे युग आणले पाहिजे.

अध्यक्ष श्री. बाबा आढाव म्हणाले, आज प्रश्न ऐरणीवर आले आहेत. आम्ही त्यावर घाव घालणार ! आजचा दिवस त्रेपन्न वर्षांपूर्वी महाडच्या चवदार तळ्याचे पाणी पेटले त्याची याद आहे. आम्ही समता हे जीवनमूल्य मानतो. समान न्याय आणि संधीची समानता मागतो. जात माणसाने निर्माण केली म्हणूनच ती जाईल यावर आमचा विश्वास आहे. आर्थिक विषमता पराकोटीला पोचली आहे. गरिबीमुळे संसाराला ठिगळ लावावे लागते, त्यातूनही बलात्कार होतात. या राज्यातले पोलीस कार्यकर्त्यांवरच केसेस भरतात. समतेच्या चळवळींचे हे वैभव आहे. मराठवाड्यात ढोकीला फासेपारध्यांची पारध झाली. जनतेनेच कायदा हाती घेतला, हे बरे नाही. पाठ्यपुस्तकांतून विषमतेचा संस्कार जोपासण्याचे काम चालू आहे. आपण इथे जमलो आहोत ते एकमेकांच्या भूमिकेला छेद न देता काही समान सूत्र काढण्यासाठी. युवक क्रांतिदल, राष्ट्रसेवा आघाडी, दलित युवक आघाडी, संघर्षवाहिनी, दलित पँथर, सर्व श्रमिक संघटना, स्त्री मुक्ति संघटना, कष्टकरी संघटना, समाजवादी युवकदल, जागृत दल यांसारख्या अनेक संस्थांचे कार्यकर्ते येथे आले आहेत. त्यांच्या गटवार चर्चेतून काही निघेल. नामांतराच्या चळवळीत १।। लाख लोक एका दिवशी तुरुंगात गेले व २५ लाख लोक रस्त्यावर आले. ग्रहणकाळात बारामतीला चारशे बलुतेदार शिबिरासाठी एकत्र आले. नवे अंकुर फुटत असल्याची ती निशाणी आहे. राजकीय पक्ष हंड्यातून भांड्यांत आणि भांड्यातून हंड्यात करू मागतात याने परिवर्तन होणार नाही.

श्रोतृवर्गात बिहारहून आलेला अनिल प्रकाश होता. जगताप आणि बढेकर हे लाल डगलेवाले हमाल पुण्याच्या स्टेशनावरून तडक शिबिरासाठी आले होते. आणिक काही नवा प्रकाश दिसतो आहे का हे बघायला गोपाळ नथू गवई हा अंधही आला होता. विदर्भातील धाकलीला न्याय मागितल्याबद्दल ज्याच्या डोळ्यांच्या खाचा सवर्णांनी केल्या त्या गवईबंधूंपैकी हा एक. अन्ययायाची जितीजागती निशाणी वागवीत पेटलेल्या मनाने तोही भिमाचा जयजयकार करत होता.

> निसर्गनिर्मित जलधरतीचा नव्हता कधि अधिकार।
> समतेची ही मशाल पेटली हरण्या अंधःकार॥
> गर्जा जयजयकार भिमाचा गर्जा जयजयकार।

## अंध-अपंगांचाही पाठिंबा

गटवार चर्चेसाठी प्रबंध तयार करण्यात आले होते. त्यांचे आधी वाचन झाले,

श्री. शरद कुलकर्णी (आदिवासी समस्या) प्रबंध व त्यांचे लेखक येणेप्रमाणे.

| | |
|---|---|
| डॉ. बोकरे | शेती |
| छाया दातार | स्त्रियांचे प्रश्न |
| कुमार शिरोळकर | ग्रामीण मजूर |
| रा. प. नेने | बेकारीचा प्रश्न |
| लक्ष्मण माने | भटक्या व विमुक्त जाती |
| हुसेन दलवाई | मुस्लिमांचे प्रश्न |
| सुदाम देशमुख | शेतमजुरांचे प्रश्न |
| विमल कीर्ती | दलितप्रश्न |

कार्यकर्त्यांची विभागणी आपापल्या आवडीच्या गटांमध्ये झाली. दुसऱ्या दिवशी गटवार चर्चेचे निष्कर्ष खुल्या अधिवेशनात मांडण्यात येणार होते.

त्याआधी राष्ट्रीय दृष्टिहीन संघाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. अब्दुल सलाम यांनी अपंगांच्या प्रश्नांवर त्यांचे विचार मांडले. या प्रश्नाकडे भीक व दयेच्या दृष्टिकोनातून बघू नये अशी मांडणी करणारे डॉ. सलाम भाषाशास्त्राचे Ph. d. आहेत. जगप्रवास केलेल्या या अंधसंघर्षवादी माणसाने आपले अनुभव सांगितले. अंध व दलितांचे प्रश्न सारखेच आहेत म्हणून दलितक्रांतीला अपंगांचा पाठिंबा राहील असे त्यांनी सांगितले. स्वतः अपंग असणारे बुद्धिमान तरुण श्री. जोशी यांनी स्वतःचे अनुभव सांगितले. कोरडी शाब्दिक सहानुभूतीवाले पुष्कळ असतात, यांचा काही उपयोग नाही. सर्व समाजालाच बुद्धीचे व मनाचे अपंगत्व आले आहे असे त्यांचे रास्त म्हणणे होते. एरवी दिल्लीतील पंतप्रधानांसमोर निदर्शने करणाऱ्या अंधांवर लाठीमार होतो त्याचे दुसरे उत्तर काय देणार ?

गटवार चर्चेतून कार्यकर्त्यांचे अनुभव बोलके होत होते. ते दाहक होते. तसेच पुढील मार्गक्रमणासाठी उद्बोधक आणि प्रेरकही. भाषणबाजीचा मोह आवरणे ही तशी कठिणच गोष्ट आहे. तरी त्यामानाने उद्घाटन व समारोप या दोन प्रसंगांव्यतिरिक्त सामान्य कार्यकर्त्यांचे अनुभव मांडायला मोठ्या प्रमाणात संधी दिली होती. सुमारे १७५ कार्यकर्त्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला.

२२ मार्चला नलिनी सोमकुअर यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांच्या प्रश्नावरील चर्चेचे संयोजन विशाखा वडसकर यांनी केले. प्रा. अनुराधा केने, संघमित्रा मेश्राम व छाया दातार याबरोबरच दहा पुरुषही चर्चेत सहभागी झाले. प्रकाश ढगे (नागपूरचे) स्त्रियांच्या उंच टाचेच्या चपलांवर घसरले तेव्हा विषयाच्या गांभीर्याची समज अध्यक्षांनी त्यांना दिली आणि खिल्ली उडविण्यासाठी हे सत्र नाही असे सर्वच वक्त्यांना आवाहन केले.

बारामतीचे श्री. विजय मोरे यांनी एक सुन्न करणारा अनुभव सांगितला. स्वतःचे नैतिक चारित्र्य सिद्ध करण्यासाठी एका स्त्रीला बारामतीपासून बारा मैलांवरच्या गावात काही महिन्यांपूर्वी उकळत्या तेलात हात बुडविण्याचे 'दिव्य' करावे लागले व त्यात हात गमवावा लागला ! अमरावतीचे ७२ वर्षांचे सत्यशोधक श्री. आनंदराव लढके यांनी दुसऱ्या लग्नासाठी बायकोची सही घेण्याकरिता कोणकोणती दडपणे आणण्यात येतात या मुद्द्यावर भर दिला. औरंगाबादचे अमर हबीब यांनी स्त्रीस्वातंत्र्यवाद्यांना एक इशारा दिला. स्त्रियांनी पुरुषी मूल्ये मानू नयेत. पुरुष सिगारेट ओढतात म्हणून आम्ही ओढू असे नसावे. नगरपालिका व ग्रामपंचायतींनी स्त्रियांकरिता मुताऱ्या व संडास बांधण्याची आवश्यकता प्रतिपादली. शेतमजूर गर्भवती स्त्रियांची काळजी घेतली जावी व तालुका पातळीवर शिकू इच्छिणाऱ्या मुलींसाठी हॉस्टेल्स असावी असाही मुद्दा त्यांनी मांडला. श्री. दत्ता साळवे यांनी स्त्रीचे अपत्यप्रेम हे सहजप्रेम असते असे विधान केले तेव्हा छाया दातारांनी ते खोडून काढले. पालकत्वचा गौरव हवा-मातृत्वाचा नको असे त्यांचे म्हणणे होते. स्त्रीचे मातृत्व नैसर्गिक असल्याने ते अमान्य करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही; पण कुटुंबव्यवस्था काही नैसर्गिक नव्हे, या मुद्द्यावर अधिक

चर्चा आवश्यक असूनही वेळेअभावी ती होऊ शकली नाही. स्त्रियांच्या प्रश्नाचे मूळ भांडवली अर्थव्यवस्था व स्त्रीकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन हे आहे ह्यावर एकमत दिसले.

## मुस्लिमांचे प्रश्न

भारतीय मुसलमानांचे प्रश्न या आपल्या प्रबंधात हुसेन दलवाई म्हणतात, 'मुसलमान पाकिस्तानाच्या निमित्ताने भारतात अविश्वासाचा बळी ठरला आहे. बांगला देशाच्या निर्मितीनंतर बहुसंख्यांकांच्या विश्वासाशिवाय या देशात आपल्याला भवितव्य नाही याची जाणीव मुस्लिम समाजात रुजत आहे. ही प्रक्रिया जोरकस करणे व दोन्ही समाजांत एकात्मता घडवून आणणे हे पुरोगामी चळवळीचे उद्दिष्ट असावयास हवे. सर्व भारत इस्लाममय करता न आल्याची खंत मुसलमान समाजात आहे. तसेच मध्ययुगातील पराभवाचे दुःख हिंदू समाजही विसरू शकला नाही. त्यामुळे दोन्ही समाजांत अगतिकता, निराशा व द्वेष वसत आहे आणि दोन्ही समाजांतील जातीयवादी संघटना या भावनेला चेतविण्याचे काम करतात.'

इस्लामधर्माप्रमाणे धर्म व राज्य यांची एकत्र सांगड घालण्यात आली आहे. उलट घटनेने धर्मनिरपेक्षतेची तत्त्वे स्वीकारली आहेत. मुस्लिम समाज प्रादेशिक स्तरावर विभागला गेला असून प्रदेशानुसार त्याच्या प्रश्नांचे स्वरूप वेगळे आहे. व्यवहारानुसार इस्लामी तत्त्वात बदल करावयाला सर्वसामान्य मुसलमानांचा विरोध दिसतो. प्रत्येक गोष्ट करताना इस्लामचे निकष लावण्याची प्रथा गैर आहे. शिक्षणात मुस्लिम समाज झपाट्याने मागे पडत असून नोकऱ्या मिळत नाहीत. आत्मविश्वासहीन परिस्थिती व नेतृत्वाचा अभाव या समाजात सर्वांत अधिक आहे. नोकऱ्यांबाबत घडणाऱ्या अनुभवांमुळे मुसलमानी समाज अधिक जातीयवादी प्रवृत्तीच्या आहारी जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. दलितांच्या प्रश्नाप्रमाणे मुसलमानांचे प्रश्न देखील व्यापक स्वरूपावर सोडवणे ही काळाची गरज बनली आहे.

चर्चेत गोपाळ दुखंडे यांनी उर्दु माध्यमाचा प्रश्न उपस्थित केला. अमर हबीब यांनी हमीद दलवाईंच्या कार्याचा गौरवाने उल्लेख करून इस्लामला तात्त्विक उत्तर शोधण्याची गरज सांगितली. शहरी मुसलमान अर्धशिक्षित, मध्यमवर्गीय व त्यामानाने आक्रमक आहे; परंतु ग्रामीण मुसलमान निराळा आहे. बुरखापद्धती खेड्यात नाही. दारिद्र्य व अज्ञान हेच मुसलमानांचे खरे मूळ प्रश्न आहेत. मुसलमान समाजातील नेतृत्व सय्यद, काझी इ. उच्च जातींतील मंडळींकडे आहे. हिंदूंमध्ये धर्मनिरपेक्षतेची भावना जिथे वाढेल तेथेच मुस्लिम Secnlarist वाढतील. उर्दूच्या आग्रहामुळे संवादहीनता निर्माण होते म्हणून उर्दू शाळेतही मराठी भाषा ऐच्छिक विषय म्हणून ठेवावा अशी सूचना त्यांनी मांडली.

आदिवासींच्या प्रश्नाबाबत प्रा. शरद कुलकर्णी यांनी मांडणी केली. आदिवासीत ११ टक्के साक्षरता आहे. महाराष्ट्रात एकूण साक्षरतेचे प्रमाण ३१ टक्के आहे. ९० टक्के आदिवासी दारिद्र्यरेषेखाली आहेत. ९६% आदिवासी ग्रामीण भागात रहातात. तेही विशिष्ट भौगोलिक विभागात केंद्रित झाले आहेत. राजकीय पक्षांचे कार्य अत्यल्प आहे. लढाऊ कार्यकर्ते त्यांचे प्रतिनिधित्व करताना दिसत नाहीत. कल्याणकारी कार्यक्रमांची जाहिरातबाजी ज्या प्रमाणात होते त्या मानाने अंमलबजावणी बिलकूल होत नाही. जंगलतोड मोठ्या प्रमाणावर होते ती प्रामुख्याने खासगी, ठेकेदार सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमताने करतात. भ्रष्टाचारी पोलीसयंत्रणा कार्यकर्त्यांवर खोटे खटले भरते. हस्तांतरित जमिनी, अतिक्रमणे रीतसर करण्याचे प्रश्न आहे. वेठबिगार लग्नगड्याच्या स्वरूपात आजही चालूच आहे. रोजगार हमी योजना राबविणे व किमान वेतन मिळवून देणे ही कामे आहेत. महादेव कोळी समाज सर्व आदिवासींमध्ये पुढारलेला आहे.

प्रा. शरद कुलकर्ण्यांनी अनेक कार्यक्रम सुचविले. त्यात सावकारांच्या चळवळ दडपण्यासाठी निर्माण झालेल्या साफिया गँगचा बंदोबस्त, संधिसाधू पुढारी व जंगलसोसायट्यांतील भ्रष्टाचार उघडकीस आणणे, जीवनोपयोगी वस्तूंची वितरणव्यवस्था सुधारणे, जिल्हावार मीटिंग घेऊन आदिवासींसाठी केलेले कायदे त्यांना समजून सांगणे अशी अनेक कामे आहेत. दारूचे प्रमाण आदिवासींमध्ये भयावह आहे. काळ्या गुळाच्या विक्रीविरुद्ध आंदोलन उभे केले तर दारूच्या प्रसारास प्रभावी आळा घालता येईल इ. मुद्दे त्यांनी मांडले.

शेतमजुरांचे प्रश्नावरील प्रबंधात श्री. कुमार शिराळकर यांनी बरीच आकडेवारी दिली आहे. त्यात ते म्हणतात—

'चार हेक्टरपेक्षा कमी जमीन असणारे जमीनधारक एकूण जमीनधारकांच्या ८५% आहेत. या सर्वांची मिळून एकूण जमीन एकूण जमिनीच्या फक्त ४०% आहे. भारतातील जमीनधारकांपैकी सुमारे ६५% जमीनधारकांना उपजीविकेसाठी मजूर म्हणून कुठे कुठे राबावे लागते. शेतीशिवाय इतर उद्योग करून पोट भरणाऱ्यांची संख्या फक्त १५% आहे. बाकी ८५% शेतीवर अवलंबून आहेत. पावसावर अवलंबून असणारी शेती एकूण जमिनीच्या ७६% आहे. त्यामुळे लागवडीखालील एकूण १८ कोटी हेक्टर्स जमिनीपैकी फक्त तीन कोटी हेक्टरपेक्षा कमी जमिनीत एकापेक्षा अधिक पिके घेतली जातात! इ. इ. डॉ. बोकरे यांच्या शेतीविषयक प्रबंधात भांडवलशाहीत शेतकऱ्यांना कधीच न्याय मिळत नसतो असे प्रतिपादन केले होते. शेतमालाचा रास्त भाव ठरविताना वर्षभराचा शेतकरी कुटुंबाचा सरासरी खर्च रु. ३५३० व बैलजोडीचा खर्च म्हणून रु. १२३२ धराबयास हवा. ते तसे न धरल्याने शेती किफायतशीर कागदोपत्री दाखविता येते. नाही तर तसा तो तोट्याचाच धंदा आहे. शेतमालाचे भाव वाढवून सांगणे व मजुरीचे दर कुटुंबखर्चास पुरेसे इतके मागणे या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

दलितप्रश्नांवरील चर्चासत्राच्या अध्यक्षा सुगंधा शेंडे होत्या तर संयोजक विमल कीर्ती. महारवतनाच्या इनामी जमिनी, दलित चळवळीतून शत्रू व मित्र नेमके हेरणे, राखीव जागा हे सर्वांच्या बेकारीचे कारण नव्हे इ. मुद्दे मांडले गेले. दलित दलितांवर म्हापशाला बहिष्कार टाकतात याचा उल्लेख भास्कर भोळ्यांनी केला तर सुरेश पगारे (नासिक) यांनी मलकापूरपासून बारा मैलांवरील वाघूड गावच्या पाणवठ्याचा अनुभव सांगितला. तेथे बुद्धांच्या विहिरीवर मांगांनी पाणी भरण्याचा कार्यक्रम झाला. जो समाज न्याय मागतो त्याने तो द्यायलाही तयार असले पाहिजे असे त्यांनी आग्रहाने मांडले.

नागपूर दलित पँथरचे पुढारी व नामांतर चळवळीतील एक नेते प्रा. नागेंद्र कवाडे यांचा या शिबिरात प्रत्यक्ष सहभाग नव्हता. 'जयभीम' नावाच्या एका साप्ताहिकात पँथरचे नारायण वाडेकरनी लेख लिहून दलितयुवकांना बाबा आढाव 'बाहेरख्याली' बनवत असल्याचा आरोप केला होता. दलितनेतृत्वामागेच दलित

अनुयायी गेले पाहिजेत हा विचार यामागे असावा. सातारच्या भटक्या जातीत जन्मलेले समाजवादी दलाचे श्री. लक्ष्मण माने यांनी या भूमिकेस प्रखर विरोध केला. फुले, आंबेडकरांना मानणाऱ्या सर्व डाव्यांना बरोबर घेऊन दलित-दलितेतरांच्या एकजुटीनेच हा प्रश्न घसास लागेल. दलितेतरांच्या हेतूंवर आरोप करून दलितांची अस्मिता मारू नका आणि दलित चळवळींना शाप देऊ नका, असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.

बेकारीसंबंधी गटचर्चेचा अहवाल श्री. रा. प. नेने यांनी सादर केला. बेकारीचे कारण लोकसंख्यावाढ नसून भांडवलशाही अर्थ-व्यवस्थाच आहे असे त्यांचे म्हणणे. ही घसरगुंडी १९६६ पासून सुरू झाली. १९७५ पर्यन्त औद्योगिक उत्पादनाचा वेग ८% पर्यन्त होता तो सहासष्टपासून घसरणीला लागला व १९७६ साली ४·१ टक्के वर आला. १९६६ ते ७२ नवीन रोजगाराची निर्मिती झाली नाही. कारखान्यांची ४० टक्के उत्पादनक्षमता पडून आहे. १९५६ साली रोजगार विनिमय केंद्रात नोंदविलेले बेकार ७·६ लाख होते, ते १९७६ साली जवळपास १ कोटीपर्यन्त पोहोचले. यापैकी दहा लाख पदवीधर बेकार होते, तर एकूणऐंशी हजार बेकार इंजिनियर होते. १९६१ व १९७७ यांतील जीवनावश्यक वस्तू व चैनीच्या वस्तूंच्या उत्पादनवाढीचे आकडे त्यांनी दिले. रेफ्रिजरेटर्स १५·८० टक्के टेलिव्हिजन ४४·९ टक्के, विमानप्रवासी ८·५ टक्के याउलट धान्य, डाळी, खाद्य तेले, साखर, सुती-कापड, दूध यातील वाढ एक-दोन टक्क्यांच्या आतली. काही बाबतीत तर उत्पादनात घटच झालेली.

जीवनोपयोगी बदल शिक्षणात व्हावयास हवा; पण तेवढ्याने भागणार नाही, समाजव्यवस्थेतही बदल आवश्यक आहे. रोजगार हमी योजनेतून बेकारांना काम मिळेल हा भ्रम आहे. त्यासाठी भांडवल नाही. आठ तासांऐवजी कामगारांचा दिवस चार तासांचा करावा अशी क्रांतिकारी मागणी श्री. वामनराव घोटे यांनी केली होती. ओव्हरटाइम जिथे करावा लागतो तेथे नवीन कामगारभरती करण्यास कामगारांनी विरोध केला याचा दाखला श्री. नेने यांनी दिला व कामाचा हक्क हा मूलभूत हक्क घटनेने मान्य करावा यासाठी आंदोलनाची आवश्यकता सांगितली. बेकार युवक परिषदा संघटित करून जमीन द्या किंवा काम द्या अशी मागणी त्यांनी करावी असेही त्यांनी सुचविले.

**ज्या देशाची लोकसंख्या दरवर्षी एक कोटीने वाढते तेथे प्रत्यक्षात समाजवादी शासन आले तरी या बेबंद लोकसंख्यावाढीला आळा घातल्याशिवाय या 'अवाढव्य' देशाचे प्रश्न कसे सुटणार? असे सारखे मनात येत होते.**

भटक्या व विमुक्त जातींचे प्रश्न या सत्राचे अध्यक्ष टकारी समाजाचे ॲडव्होकेट अरविंद गायकवाड व संयोजक लक्ष्मण माने. नंदीवाले, कैकाडी, माकडवाले, उचले, भामटे, फासेपारधी या आणि अशाच इतर ३६ जाती यात मोडतात. त्यांची दुःखे कार्यकर्ते बोलत होते आणि श्रोत्यांना सर्वच नवीन वाटत होते. ही सर्व माणसेच, पण भारतीय नागरिक नाहीत. कारण मतदार म्हणून त्यांची नोंदच नाही. त्यामुळे पुढाऱ्यांचे लक्ष नाही. दलित बुद्धाला गावकुसाबाहेर का होईना पण छप्पर आहे. हे अनिकेत यांचा दिवस चोरीने सुरू होतो व रात्र गजाआड बंद होते. कुठल्याही खेड्यात गेल्यावर पोलीसपाटलाला आपल्या तांड्यात कोंबडी, गाढव, मुले, म्हातारे, बाया, बापे किती आहेत याचा जाब द्यावा लागतो. उठून जाताना परत सांगावं लागतं. शक आला तर झडती होते. स्वतंत्र जातपंचायत यंत्रणा बारशापासून बाराव्यापर्यंतची व्यवस्था पाहते. जातीअंतर्गत कुणी खून केला तरी कोणी पोलिसाकडे जात नाही. हे हिंदूच नाहीत त्यामुळे अस्पृश्य नाहीत. स्वतःचे लाकडाचे, दगडाचे देव बरोबर घेऊन सुगीकरता निरनिराळ्या भागात ठरलेल्या मार्गावरून यांचे तांडे जात असतात. टकारी समाजात पोलीस, जेल यांच्याशीच संबंध म्हणून मुलांची नावे शिगरेट्या, जेल्या, पिस्तूल्या, वारंट्या ही. पारधी स्त्री देखणी असते, पण दिवसेंदिवस आंघोळ करत नाही त्यामुळे अंगाला वास मारतो; पण उगाच कुणाला भावना होऊ नये, म्हणून तिने केसही विंचरायचे नाहीत हा जातीनियम. पारधी दारुडे बायकोवर विश्वास ठेवत नाहीत म्हणून रात्री स्त्रीचे कपडे काढून घेऊन डोक्याशी ठेवतात व झोपतात. अशा या समाजात शिक्षण अवघे एक टक्का. राखीव जागा व सवलती आहेत म्हणून एवढे तरी. प्रा. जोगदंड यांनी अंबाजोगाई मेडिकल कॉलेजमध्ये स्वतःची जात राजपूत न लावता राजपूत भामटे लावून मागासवर्गीयांसाठी असलेल्या मराठवाड्यातील पुढाऱ्यांची माहिती सांगितली. शिबिराला नागपूरमधील काही मांगगारुडी येणार होते, पण येऊ शकले नाहीत, कारण? नागपूरमध्ये सध्या दरोडेखोरांनी धुमाकूळ घातला आहे. पोलिसांचा वहीम नेहमीप्रमाणे या भटक्या व गुन्हेगार समजल्या गेलेल्या जातींवर असतो. मारझोड नी फुकटचा ताप नको म्हणून बहुतेक सर्व पुरुषमंडळी परागंदा झालेली. भीतीचे वातावरण. एका कार्यकर्त्याकडून एक मजेदार किस्सा समजला. मांगगारुडी जातीची मंडळी भटके न राहता शहराच्या एका वस्तीत स्थिरावली आहेत. म्युनिसिपालिटीने त्यांच्या वस्तीत सोय म्हणून रस्ता करायचे ठरवले, तर लोकांनी विरोध केला. रस्ता नको. विकास नको. कारण काय? तर आत्ता रस्ताच नाही त्यामुळे पोलिसांची निळी गाडी दुरून दिसते व पळून जाता येते. उद्या रस्ता झाला म्हणजे इलाजच नाही. उगा ब्याद नको!

जादूटोणा, भानामती, अंधश्रद्धा यांचा सुळसुळाट असलेल्या या समाजाचे प्रश्न, विषय सर्वस्वी नवीन पण अपुऱ्या माहितीअभावी या प्रश्नांची जाणच समाजात अद्याप निर्माण झाली नाही हे तीव्रतेने जाणवले.

¤

चोवीस मार्च हा शिबिराचा शेवटचा दिवस. विषयही जिव्हाळ्याचा. 'नामांतराचे पुढे काय? आणि समता चळवळीची पुढील दिशा.' अध्यक्षस्थानी श्री. म. रा. ऊर्फ बाबा दळवी होते. श्री. सुभाष लोमटे यांनी प्रास्ताविक केले. हा लढा समतेचा असून आम्ही कोणताही पर्याय स्वीकारणार नाही. आजवर लोकशाही पद्धतीने व शांततेने चालवलेला हा लढा तसाच यापुढे चालवण्याची आवश्यकता त्यांनी सांगितली. मुंबईच्या छाया दातार यांनी विद्यापीठाचे नामांतरासंबंधात साहित्यिकांच्या सह्या गोळा करण्याच्या उपक्रमात प्रतिसाद कसा अत्यल्प होता त्याची व्यथा सांगितली. समान कार्यक्रमाची आवश्यकता सांगून त्या म्हणाल्या, दलित व दलितेतर यांच्यात संशयाचे वातावरण आहे ते दूर करावे लागेल.

पुण्याचे प्रा. वि. द. देशपांडे (ग्रामायन) त्यानंतर म्हणाले, कार्यकर्त्यांचे अनुभव समाजदर्शन घडवतात; परंतु अशा मेळाव्यांची गरज उग्रतेने पटलेली दिसत नाही. सुसूत्रीकरणासाठी बळकट संघटना हवी. या कामात आस्था असलेल्या पण प्रत्यक्ष कामात नसलेल्या शहरी माणसांनी साहाय्य केले पाहिजे. कार्यकर्त्यांत संशय आहे तो नेतृत्वाचे श्रेय कुणी घ्यायचे या मुद्द्यावर. समता चळवळीचे काम एकत्र येण्यानेच होईल." प्रा. देशपांडे हे अत्यंत समयोचित व विषयाला

धरून बोलत होते; परंतु नामांतराचा प्रश्न समतेचा न मानता केवळ बौद्ध अस्मितेचा मानणाऱ्या काही जणांना ते आवडले नाही. त्यांनी नामांतरावर बोला, विषयाला धरून बोला असा आरडाओरडा सुरू केला. अध्यक्ष श्री. बाबा दळवी यांनी हस्तक्षेप करून गडबड करणाऱ्यांना चापले, हे योग्यच झाले.

**वास्तविक क्रियाशील कार्यकर्त्याला विचार टाळून चालणार नाही. निव्वळ धांगडधिंगा म्हणजे अॅक्टिव्हिटी नव्हे, हे कुणी तरी सांगायलाच हवे होते.**

औरंगाबादचे अमर हबीब यांनी वेगळाच सूर लावला. नामांतरवादी कृतिसमिती अकार्यक्षम झाल्याचा आरोप त्यांनी केला. मराठवाड्याची वेगळी कृतिसमिती राहायला हवी व सुसूत्रीकरण औरंगाबादेतूनच व्हायला हवे. यापुढे आंदोलनाची बलकेंद्रे पुणे, मुंबई, नागपूर ही शहरे न राहता खेडी व्हायला हवीत असे त्यांचे मुद्दे होते.

यानंतर उठले धुळ्याचे मार्क्सिस्ट श्री. शरद पाटील. गेल ऑम्वेट या विदूषीने महात्मा फुलेंवरील लिहिलेल्या ग्रंथाला त्यांनी प्रस्तावना लिहिली व वर्ग–लढयाचा पुरस्कार केला म्हणून डाव्या कम्युनिस्टांनी त्यांना पक्षातून काढून टाकले आहे. कमी वेळात मला बोलता येणार नाही, किमान अर्धा तास तरी पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. (वास्तविक सामान्य कार्यकर्त्याला वेळ अधिक हवा. पाटलांसारख्या मुरब्बी नेत्याला व भाषणांची सवय असलेल्या पुढाऱ्याला दहा मिनिटांत आपले विचार मांडता यायला हवेत.) प्रभावी व्यक्तिमत्त्व व भारावणारे वक्तृत्व यांच्या जोरावर शरद पाटलांनी फड गाजवला. ते संपूर्णपणे राजकीय भाषेत होते. जातिव्यवस्था अनादि नाही, विलोपिकेत (इ. स. पूर्व ६ वे शतक) तिचा प्रथम उल्लेख आहे. इथून सुरुवात करून इंदिरादेवी व देवरस यांच्यात हुकूमशाही वर्गव्यवस्था व हुकूमशाही जातिव्यवस्था एकत्र आणण्याचा संकेत झाला आहे येथपर्यंत ते पोहोचले. केरळ व बंगालमधील कम्युनिस्ट सरकारे बाई उलथवणार असल्याचा अंदाज त्यांनी दिला व आसाममधील चालू घडामोडींचा संबंध, बंगाली कम्युनिस्टांविरुद्धची चळवळ असा जोडला. एस. एम. जोशी तपस्वी आहेत, बाबा आढावांनी त्यांना तसे सांगावे. ते बाहेर पडले तर सर्व समाजवादी बाहेर पडतील अशी चिथावणी देणारी भाषा त्यांनी वापरली. सरकार पाशवी शक्तीचा वापर करीत असल्याने गंभीर परिस्थिती आहे; पण समतेच्या दिशा उजळताहेत. शेवटी दलित व दलितेतर व श्रमिकांची अधिसत्ताच न्याय देईल हे सांगून त्यांनी आपले लांबलेले भाषण संपवले.

नंतर उठले बाबा आढाव. प्रा. व्ही. डी. देशपांडे यांचे भाषण विषयाला धरून होते हे सांगून त्यांनी कार्यकर्त्यांना समज दिली. अमर हबीब यांचे संदर्भाचे सुटलेले भान त्यांना जाणवून दिले. सांस्कृतिक प्रश्न नाकारून चालणार नाही आणि भूक नाकारून अध्यात्म येणार नाही हे वास्तव त्यांनी मांडले.

चर्चेतील समान सूत्र म्हणून त्यांनी तीन गोष्टी सांगितल्या.

पहिली नामांतराचा प्रश्न केवळ बौद्ध अस्मितेचा नाही, तो समताचळवळीचा आहे. दुसरे दलित-दलितेतर व श्रमिकांची एकजूट करण्यासाठी जुने पुढारी अकार्यक्षम ठरले तर नवीन नेतृत्व उभे राहील असा विश्वास प्रगट केला. तिसरे नामांतर चळवळीला नेतृत्व औरंगाबादची समितीच देईल अशी ग्वाही दिली.

संस्काराच्या क्षेत्रात विषमता जोपासली जात आहे हे काही मासिके व पाठ्यपुस्तकांतील उदाहरणांद्वारे त्यांनी दाखवून दिले. लोकनाट्य, कलापथके या क्षेत्रात समतेची कूस वांझोटी ठरू नये अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. (शिबिरस्थळी रात्री उशीरापर्यंत चाललेले श्री. दुपारे यांचे नाटक, अरुणा पवार, उल्हास मनोहर, बाहरू सोनवणे यांचे कवितावाचन व फलटणच्या जागृती दल व स्त्रीसंघटनेची गाणी ही सर्व बाबा आढावांची अपेक्षा नक्की पूर्ण होईल, याचा इसार होती).

दलितांवरील अन्यायाच्या बातम्या पुरवण्याच्या न्यूज एजन्सीचे काम फुले प्रतिष्ठान करेल असे त्यांनी सांगितले. संवाद, प्रबोधन, रचना व संघर्ष या मार्गाने व्याख्यानमालेद्वारा जनशिक्षण करत व समता परिषदा संघटित करून पुढे जावे लागेल.

पोलीस चोपणारच, कारण कार्यकर्त्यांना सरळ करा असे त्यांना वरून आदेश आहेत; पण कार्यकर्त्यांनी भाषा वापरताना संयम राखायला हवा, अशी स्पष्ट कानउघडणीही त्यांनी केली. शरद पाटील यांच्या एस. एम. जोश्यांच्या विधानाबद्दल ते म्हणाले, एस. एम. ना मी बदलवीन असा मला अहंकार नाही. त्यांच्याबद्दल मला पूर्ण आदर आहे; पण वरची म्हातारी माणसे बदलवून काही होणार नाही. लढाई खालूनच होणार.

समारोपासारखी भाषणे झाल्यानंतर प्रा. माधव मोरे, डॉ. वानकर, दत्ता कारभेरे व पंचभाई काय सूचना मांडताहेत याकडे कुणाचे लक्षच नव्हते.

विशिष्ट निर्णय घेण्यासाठी हे शिबिर नव्हते. नामांतराबाबत पुढील कार्यक्रम मराठवाड्यात एप्रिलमध्ये होणाऱ्या बैठकीत ठरवण्यात येईल असे सांगण्यात आले. भ्रातृभाव निर्माण करण्याचा उद्देश सर्वसाधारणपणे सफल झाला असेच म्हणावे लागेल. याचे श्रेय श्री. चौधरी, बाबा दळवी व अशोक थळे, विनायक जामगडे यांच्याकडे जाते.

विविध राजकीय विचारप्रणालींची मंडळी एकत्र जमली होती. लोकशाही समाजवादी, आंबेडकरवादी, शास्त्रीय समाजवादी (कम्युनिस्ट) पासून छिंदवाड्याहून आलेल्या नक्षलवाद्यांपर्यंत सर्वच त्यात होते. कम्युनिस्ट जोरात दिसले. हे व्यासपीठ बळकावून कुठल्याच पक्षाशी संबंधित नसलेल्या तळच्या कार्यकर्त्याला आपल्या विचारांकडे आकर्षित करण्याची अभिलाषा धरून त्यांनी डावपेच आखले असतील असे एखाद्याने म्हटले असते तर कम्युनिस्टांचा इतिहास त्याला दुजोराच देईल.

नागपूरहून रेल्वेने परतत असताना शिबिराला आलेला सातारा जिल्ह्यातील एक वडारयुवक भेटला. पाथरवट-वडारातील हा देवऋषी. डोक्यावर देव घेऊन नाचणारा, समाजाच्या जत्रेसाठी काळी पाट (पिल्ले न झालेली बकरी) कापणारा, पोटात दुखते म्हणून अंगठ्याला काळा दोरा आवळून बांधणारा एक माणूस. रेल्वेच्या डब्यात त्याने 'पोट दुखण्याचा व या दोऱ्याचा काही संबंध नाही' असे सांगितले. मला म्हणाला, 'मी देवऋषी समाजात लोकांना मंत्र देतो, नियम घालतो; पण तीन दिवस शिबिर ऐकले व तुम्हाला सांगतो देवबिव सगळं बंडलच दिसतं!'

शिबिराच्या यशस्वितेची ही पावती समजून मी मनोमन हसलो.

**—एक समता सैनिक**

# अस्वस्थ आसाम

**लेखांक सहावा** | **विनय सहस्रबुद्धे**

## गुजराथ–बिहार आंदोलनापेक्षाही मोठी व्याप्ती असलेले आंदोलन

आसामच्या अस्वस्थतेचा शोध घेणाऱ्या या लेखमालेतील हा अखेरचा लेखांक आहे. आसामातील या अभूतपूर्व जनआंदोलनाची विस्तृत पार्श्वभूमी आणि आसामच्या आर्थिक मागासलेपणाविषयी पहिल्या दोन लेखांकांत विस्तृत विवेचन केलं होतं. त्यानंतर अनुक्रमे आंदोलनाचा आरंभ आणि व्याप्ती, आंदोलनातील हिंसापर्व, बंगाली–असमिया संघर्ष, राजकीय पक्षाच्या भूमिका इ. विषयांचीही चर्चा झाली. या समारोपाच्या लेखांकात मार्च महिन्यात केंद्र–सरकारशी विद्यार्थीनेत्यांच्या झालेल्या वाटाघाटी व अन्य घटनांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटी या आंदोलनाचं स्वरूप, सामान्यांचा त्यातील सहभाग व त्याचे एकूण समाजजीवनावर झालेले परिणाम आणि या आंदोलनाचं भवितव्य यांचा मागोवा घेतला आहे.

गेल्या फेब्रुवारीत नवं केंद्रसरकार स्थिरस्थावर झाल्यानंतर, पंतप्रधान इंदिरा गांधींनी विद्यार्थीनेत्यांना चर्चेस बोलावून उभयपक्षी वाटाघाटींची सुरुवात केली होती. वाटाघाटींची दुसरी फेरी गृहमंत्री झैलसिंग यांनी गौहातीत पुरी केली; पण या दोन्ही चर्चा मूळ समस्या सोडविण्याच्या संदर्भात निष्फळच ठरल्या होत्या. १ मार्चला दिल्लीत आसामातील प्रमुख राजकीय नेत्यांना चर्चेला बोलावून पंतप्रधानांनी वाटाघाटी पुढे चालू ठेवल्या. श्रीमती गांधींनी या प्रसंगी केलेल्या भाषणात जम्मू व काश्मीरप्रमाणेच आसामच्या आर्थिक मागासलेपणावर उपाय शोधण्यासाठी मंत्रिमंडळाची एक उच्चाधिकार समिती नेमण्याचा विचार करता येईल, असं म्हटलं. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात 'भूमिपुत्रांना नोकऱ्या' या तत्त्वावर टीका केली. त्यांनी आसामच्या सांस्कृतिक संपन्नतेचा उल्लेख करून असमिया संस्कृती अखेर विशाल भारतीय संस्कृतीचाच एक भाग असल्याचंही नमूद केलं.

या बैठकीत काही मूलभूत मुद्द्यांवर सर्व राजकीय पक्षांचे ऐक्य घडवून आणण्यावरच पंतप्रधानांचा जोर होता; परंतु लवकरात-लवकर तडजोड काढून आंदोलन मागे घेतले जावे या मुद्द्याखेरीज अन्य बाबींवर या बैठकीत राजकीय पक्षांचे मतैक्य झाले नाही. या बैठकीला हजर असलेले लोकदलाचे प्रतिनिधी जॉर्ज फर्नांडीस यांच्या प्रतिक्रियेत या बैठकीची निरर्थकता स्पष्ट झाली आहे. खा. फर्नांडीस म्हणाले की, आंदोलनातील समस्यांवर तोडगा शोधण्यासाठी अशा प्रकारच्या बैठकींनी काही साध्य होणार नाही. कारण इथे हजर असलेल्यांपैकी कोणीही अप्रत्यक्षपणे आंदोलनात सहभागी झालेले नाहीत.

७ मार्चला आसाम स्टुडंटस युनियनच्या २४ जणांच्या शिष्टमंडळाशी पंतप्रधानांनी चर्चा पुढे सुरू ठेवली. या चर्चेत १९७१ हेच आधारवर्ष ठेवून परकीय नागरिक कोण ते ठरविण्याचा केंद्रसरकारचा आग्रह कायम होता व हा तोडगा विद्यार्थ्यांनी फेटाळून लावला. श्रीमती गांधींनी चर्चेच्या आरंभीच विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय परिस्थितीतील तणाव व भारतीय उपखंडातील चिंताजनक स्थितीची कल्पना दिली. आसामातील आंदोलन चिघळत ठेवून

विद्यार्थीनेत्यांनी निदान नव्या समस्या निर्माण करू नयेत अशी विनंतीही केली.

विद्यार्थीनेत्यांनी या विनंतीला प्रतिसाद म्हणून आपले आंदोलन थांबविण्याची तयारी दर्शविली. मात्र सर्व परकीय नागरिकांना आसामातून हलविण्याची घोषणा तत्पूर्वी केंद्रसरकारने करावी अशी त्यांची मागणी होती. यावर परकीय नागरिक कोण? असा प्रश्न विचारून पंतप्रधानांनी परकीय नागरिकांची घटनेतील व्याख्या योग्य समजता येणार नाही असे सांगितले. परिणामतः चर्चा इथेच खुंटली.

या चर्चेत पुढे गणसंग्राम परिषदेच्या नेत्यांनाही पाचारण करण्यात आले. १२ मार्चला चर्चेची अखेरची फेरी झाली. बाकी बहुसंख्य मुद्द्यांवर मतैक्य झाले; पण १९५१ की १९७१ हा वाद संपला नाही. परिणामतः चर्चेची गाडी पुढे सरकली नाही. २६ मार्चला आसाम बंद पाळून विद्यार्थीनेत्यांनी आपला निर्धार व त्याला जनतेची भरभक्कम साथ असल्याचे दाखवून दिले.

आसामातील आंदोलनाच्या संदर्भात प्रमुख घटनांचा साकल्याने विचार केल्यानंतर या आंदोलनाचं नेमकं स्वरूप काय आहे याचा विचार करता येईल. पूर्वग्रह पुसून स्वच्छ मनानं विचार करताना हे आंदोलन रा. स्व. संघ किंवा सी. आय. ए. ने चालविलं आहे, ह्या म्हणण्यात अजिबात तथ्य नाही हे लक्षात ठेवलं पाहिजे. संघाच्या या आंदोलनातील सहभागाबद्दल याआधीच्या लेखांकात विवेचन केलं आहे, त्यावरून हे स्पष्ट आहे की आंदोलन सुरू करण्याची वा आता त्यावर स्वार होण्याइतकी ताकद आसामातील रा. स्व. संघाकडे नाही. हे आंदोलन सी. आय. ए. चालविते हे म्हणणेही दुधखुळेपणाचे आहे. उभ्या आसामात घराघरातली माणसं रस्त्यावर आणण्याइतका एखाद्या गुप्तहेरसंघटनेचा प्रभाव असेल असे वाटत नाही. आता तर खुद्द गृहमंत्र्यांनीच या आरोपाचा इन्कार केला आहे.

या आंदोलनाचे उद्दिष्ट भारतापासून फुटून निघणे हे आहे या म्हणण्यातही तथ्य नाही. 'बाय बाय इंडिया' किंवा 'लेट अस क्रिएट अ सेकंड यू. एस. ए. (युनायटेड स्टेटस ऑफ आसाम)' अशा शीर्षकाची पत्रके मी स्वतः पाहिली आहेत; पण तरीही सर्वसामान्य असमिया जनतेची इच्छा या पत्रकात म्हटल्याप्रमाणे भारताचा निरोप घेण्याची आहे असे अजिबातच नाही. खुद्द राज्यसरकारेही या पत्रकांना फाजील महत्त्व देत नाहीत! या पत्रकबाजीकडे दुर्लक्ष होऊ नये हे खरेच; पण त्याहीपेक्षा या पत्रकांच्या आधारे या आंदोलनावर 'विलगतावादी' असे शिक्कामोर्तब न करणे अधिक महत्त्वाचे आहे. अपप्रचारातून निर्माण झालेले हे पूर्वग्रह पुसूनच आसामातील आंदोलनाचे स्वरूप पाहिले पाहिजे.

## गुजराथ–बिहार–आसाम

गुजरात आणि बिहारमध्ये अलीकडच्या काळात झालेल्या आंदोलनांप्रमाणेच आसामातील आंदोलनही प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी सुरू केलेलं आहे; पण असे असले तरी गुजरात व बिहारच्या आंदोलनांपेक्षा आसामातील आंदोलनाची व्याप्ती व आंदोलनविषयाचे गांभीर्य मोठे आहे. गुजरात आणि बिहारमधली आंदोलने प्रामुख्याने भ्रष्टाचाराच्या विषयावर सुरू झाली व विद्यार्थ्यांच्या हातून आंदोलनाची सूत्रे हळूहळू राजकीय नेत्यांच्या हातात गेली. परिणामतः स्वाभाविकच या दोन्ही आंदोलनांना एक प्रकारचा राजकीय रंग, उशीरा का होईना, आला होता. या दोन्ही आंदोलनात सुरुवातीस जे आघाडीवर होते त्यांच्या मनात राजकीय हेतू नव्हते हे खरे असले तरी कालांतराने पक्षीय राजकारणामुळे या आंदोलनाच्या यशाला मर्यादा पडल्या हे मान्य करावे लागेल. आसामचे आंदोलन या दोन्ही आंदोलनांपेक्षा वेगळे आहे, याचे मुख्य कारण म्हणजे त्याचे राजकारणातीत स्वरूप, विद्यार्थीनेते जो निर्धार आणि जी निर्णयक्षमता दाखवीत आहेत त्यावरून हे नेते कोणा राजकीय नेत्याच्या हातचे बाहुले बनतील हे संभवनीय वाटत नाही.

आसामातील प्रमुख ११ सामाजिक संघटनांची गणसंग्राम परिषद आंदोलनात अग्रभागी असली तरी विद्यार्थीसंघटनेला डावलणे संग्रामपरिषदेस शक्य नाही. शेवटी आंदोलकांचा उत्साह टिकवून धरण्याचं व जिद्दीने आंदोलनाचा किल्ला लढवत ठेवण्याचं काम विद्यार्थी संघटनाच करीत आहे. त्यामुळेच गणसंग्रामपरिषदेला विद्यार्थीनेत्यांना मान्य नसलेल्या अनेक गोष्टींबाबत आपला आग्रह सोडून द्यावा लागला आहे. या संदर्भात एक उदाहरण सांगण्यासारखे आहे. गेल्या २६ जानेवारीला राष्ट्रध्वजाऐवजी गणसंग्रामपरिषदेचा ध्वजच केवळ फडकवावा आणि आपला असंतोष याद्वारे व्यक्त करावा अशी गणसंग्रामपरिषदेच्या काही नेत्यांची इच्छा होती; पण विद्यार्थीनेत्यांनी ही कल्पना सपशेल फेटाळून लावली. असं कोणतंही कृत्य राष्ट्रध्वजाचा व पर्यायाने राष्ट्राचा अपमान ठरेल या जाणिवेतून त्यांनी आधी राष्ट्रध्वज व त्यापेक्षा दोन फूट कमी उंचीवर, वर्तुळात आसामचा नकाशा असलेला, गणसंग्रामपरिषदेचा ध्वज उभारला. या दिवशी सर्व सरकारी समारंभांवर बहिष्कार टाकण्यात आला आणि हजारोंच्या उपस्थितीत विद्यार्थीनेता प्रफुल्लकुमार मोहंता याच्या हस्ते ही दोन ध्वजारोहणं थाटात पार पडली.

गणसंग्रामपरिषद व विद्यार्थीसंघटनेत असे छोटेमोठे मतभेद कारणा–कारणाने निर्माण होत असले तरी त्याचा आंदोलनाच्या एकजुटीवर परिणाम झाल्याचे दिसत नाही. अठरापगड जातीचे, शहरी आणि खेडूत, गरीब आणि श्रीमंत, राष्ट्रवादी आणि विघटनवादी, तरुण–प्रौढ, असे सगळे भेद विसरून आपल्या समस्या सोडवून घेण्यासाठी आसामची जनता भावनिकदृष्ट्या एकरूप झाली आहे काचार जिल्हा वगळून उर्वरित आसामची या आंदोलनातील एकजूट आज तरी अभेद्य आहे.

या आंदोलनाची सूत्रे जिथून हालतात त्या ऑल आसाम स्टुडंटस युनियनच्या गौहातीतील कॉटन कॉलेजमधील कार्यालयात उदंड उत्साहात विद्यार्थीनेत्यांच्या हालचाली सुरू असतात. त्यांचं सर्व कार्य करड्या शिस्तीत चालतं असं नाही, ते शक्यही नाही; पण त्याचबरोबर कामात कुठलाही विस्कळितपणा किंवा आक्रस्ताळेपणा दिसून आला नाही. आंदोलनाची माहिती घ्यायला येणाऱ्यांसाठी, त्यांच्या आगत–स्वागतासाठी खास व्यवस्था आहे. आंदोलनातील दैनंदिन कार्यक्रमांच्या नोंदीचीही व्यवस्था आहे. आसामातील अन्य प्रमुख शहरातील आंदोलनवृत्त रोजच्या रोज मिळवून त्याची तपशीलवार नोंद करण्याचीही तजवीज आहे.

या आंदोलनामुळे आसामातील बहुसंख्य विद्यार्थ्यांचे किमान एक शैक्षणिक वर्ष वाया जाणार आहे. गेले सहा–सात महिने आंदोलन सुरू आहे व पुढेही ते लवकर थांबण्याची शक्यता नाही. त्यामुळे सत्याग्रह, निरोधने, मोर्चे वा बंदसारखे कार्यक्रम हा अभ्यासाचे ओझे नसलेल्या विद्यार्थ्यांचा एक रोजचा कार्यक्रम झाला आहे. त्यामुळे आंदोलनाचे वातावरण सर्वत्र असूनही एकूण परिस्थिती तंग वगैरे आढळत नाही. याचे जसे काही फायदे आहेत, तसे काही तोटेही. विशेषत: विद्यार्थ्यांच्या हालचालींतील सैलपणा व महाविद्यालये बंद असल्याने आलेली निष्क्रियता नजीकच्या भविष्यात नवनव्या समस्या निर्माण करू शकते.

बिहारच्या आंदोलनाप्रमाणे या आंदोलनामागे कोणी एकच नेता आहे असं नाही. हे आंदोलन आज खऱ्या अर्थाने संपूर्ण समाजाचं आंदोलन झाल्यामुळं व विद्यार्थीनेत्यांपासून कामगारनेत्यापर्यंत सर्वांना मान्य होईल असं कोणतंच नेतृत्व नसल्याने हे आंदोलेन एका व्यक्तीच्या प्रभावाखालील आहे असे नाही. थोडक्यात म्हणजे निर्धार, जननेतृत्व, लोकांचा सहभाग, विद्यार्थीनेत्यांची निर्णयक्षमता इ. बाबतीत स्वातंत्र्योत्तर भारतात घडलेल्या अन्य चळवळींपेक्षा ही चळवळ तिच्या वेगळेपणामुळे अधिक महत्त्वाची आहे.

आसामच्या या आंदोलनाचे तिथल्या समाजजीवनावर अनेक भले–बुरे परिणाम झाले आहेत. या संपूर्ण आंदोलनाचं स्वरूप असं आहे, जनमताच्या प्रचंड दबावापुढे ठरवूनही एखादा समाजघटक आंदोलनापासून अलिप्त राहू शकला नसता, राहू शकलेला नाही. शामलाल वर्मा या एका बिहारी सायकलरिक्षावाल्यानं सांगितलं की, हे आंदोलन जंगलात पेटलेल्या वणव्यासारखं आहे. वर्मानं या आंदोलनाला दोन रुपये वर्गणी दिली आहे आणि त्याचा वीस वर्षांचा तरुण मुलगा सत्याग्रहातही जाऊन आला आहे. सौ. गीता गोगाई या एका मध्यमवर्गीय गृहिणीनं सांगितलं, आसामच्या समाजजीवनात महिला नेहमीच आघाडीवर राहिल्या आहेत आणि या आंदोलनातही महिलांचा मोठा सहभाग आहे. ‘या आंदोलनामुळे तुमच्या कौटुंबिक जीवनाची घडी विस्कटली नाही काय?’ या प्रश्नावर सौ. गोगोई म्हणाल्या, ‘विस्कटली नाही’ असं कसं होईल? आमच्यापैकी अनेकांनी घरातली लग्नकार्यं लांबणीवर टाकली आहेत. दैनंदिन कार्यक्रमातही बदल केले आहेत. थोडा वेळ कळ सोसून, पण घुसखोरांना हाकलून देऊन आसामला वाचविण्याचा आमचा निर्धार आहे. या आंदोलनामुळे एक वेळ आमची हानी होईल; पण निदान आमची मुलं तरी सुखानं जगतील!’ असंही सौ. गोगोई म्हणाल्या. नलबारीच्या एका महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. अशुतोष गोस्वामी यांनीही या आंदोलनाचं ‘ऐतिहासिक आंदोलन’ या शब्दात वर्णन केलं. त्यांच्या मते स्वातंत्र्यचळवळीनंतर इतक्या शांततेने पण संघटितपणे लोकशक्तीचा एवढा समर्थ साक्षात्कार कधीही झाला नव्हता! एक पत्रकार श्री. अमृत मुखोपाध्याय व एक प्राथमिक शिक्षक श्री. सेवाराम बराह यांनी मात्र ह्या आंदोलनाचं समर्थन करीत असतानाच ते आता बंद ठेवावं हे आपलं मतही व्यक्त केलं.

## साहित्यसभेचे कार्य

या आंदोलनामुळे आसाम साहित्यसभा प्रथमच सक्रियपणे समाजकारणात उतरली आहे. सर्वसाधारणपणे अशा सामाजिक चळवळीतून व्यक्तिगतरीत्या साहित्यिक सहभागी होत असले तरी त्यांच्या, मुळात निष्क्रिय असलेल्या, प्रातिनिधिक संघटना आंदोलनात उतरल्याचं आढळत नाही. आसाम साहित्यसभा हा मात्र एक अपवाद. या साहित्यसभेचे उपाध्यक्ष श्री. रजनीकांत शर्मा यांच्या सांगण्यानुसार आसामातील अनेक प्रथितयश साहित्यिक या आंदोलनांतर्गत सत्याग्रहात सामील झाले आहेत. असमिया साहित्याने आसामातील विभिन्न समाजाच्या सामिलीकरणास गती दिल्याचे सांगून ते म्हणाले, असमिया भाषेतील एक श्रेष्ठ साहित्यिक कै. ज्योतीप्रसाद आगरवाल हे मारवाडी समाजातील होते व आजही त्यांचा स्मृतिदिन ‘ज्योतीदिन’ म्हणून सर्वत्र पाळण्यात येतो.

आसाम साहित्यसभेने या आंदोलनाबाबत बुद्धिमंतांमध्ये जागृती निर्माण करण्यात मोठी कामगिरी बजावली आहे. दिब्रुगड विद्यापीठाच्या असमिया विभागातील एक प्राध्यापिका श्रीमती मोंतला शर्मा यांनी सांगितलं, आसाम साहित्यसभेने या सर्व समस्येचे गांभीर्य नीटपणे ओळखले आहे व त्यामुळेच वाढत्या घुसखोरीमुळे बहुसंख्य हिंदूंच्या स्थैर्यास व सुरक्षिततेस धोका निर्माण झाल्याचे साहित्यसभेने स्पष्टपणे म्हटले आहे.

या आंदोलनामुळे सर्वाधिक हानी झाली आहे ती व्यापाऱ्यांची. गौहातीच्या फांसी बझार व त्याला लागून असलेल्या प्रचंड बाजारपेठेतील एक फेरफटका या हानीची कल्पना येण्यास पुरेसा आहे. सर्वसामान्यांनाही या आर्थिक नुकसानीची कल्पना आली ती प्रामुख्याने बेसुमार भाववाढीमुळे. सरसकट सर्व जीवनावश्यक वस्तूंचे भाव सुमारे ३० टक्क्यांनी वाढले आहेत. त्यात पुन्हा प्रशासनिक गैरव्यवस्थेमुळे काही निवडक वस्तूंची चणचणही भासतेच; पण असमियांचे एक बरे आहे! ताटभर भात आणि वाडगाभर आमटी एवढाच आहार असल्याने एक तांदूळ व तुरीची डाळ मिळाली की बाकी वस्तू न मिळाल्या तरी फारसे बिघडत नाही. एक तरुण व्यापारी श्री. अरुण बजाज यांनी सांगितल्याप्रमाणे आसामातील आर्थिक परिस्थितीमुळे बहुसंख्य व्यापाऱ्यांनी कोणतीही नवी गुंतवणूक करणे थांबविले आहे. वाहतुकीत या आंदोलनाने वारंवार व्यत्यय येत असल्यामुळे मालाचा पुरवठा अनियमितपणे सुरू आहे. शिवाय आसामातून मिझोराम, नागालँड, मणिपूर इ. राज्यांनाही जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा विस्कळित झाला आहे. अन्य एका व्यापाऱ्याने एक गंमतीदार गोष्ट सांगितली. मी गौहातीत असतानाच सूर्यग्रहण पार पडले. या ग्रहणाच्या दिवशी आसामात भूकंप होणार अशी जोरदार चर्चा सर्वत्र आधीपासूनच सुरू होती. या भूकंपाच्या भयामुळे अनेक व्यापारी थेट मारवाडात निघून गेले असं अनेकांकडून सांगण्यात आलं.

आंदोलनामुळे आधीच खालावलेली आर्थिक परिस्थिती आसामच्या आर्थिक नाकेबंदीच्या प्रयत्नांमुळे अधिक चिंताजनक बनली आहे. जीवनावश्यक वस्तूंची कमतरता मोठ्या प्रमाणावर भासत असून त्यामुळे भाववाढीस उत्तेजन मिळत आहे. अधिकृत सूत्रांच्या सांगण्यानुसार आज आसामात साखरेचा भाव १२ ते १५ रु. किलो तर मीठ ५ ते ६ रु. किलो एवढे महाग आहे. गेल्या सप्ताहात ‘टाइम्स ऑफ इंडिया’नं दिलेल्या वृत्तानुसार राज्यात अन्नधान्याचे राखीव साठे पुरेसे नाहीत व नवी आवक बंद असल्याने मूळच्या टंचाईत भर

पडली आहे. शहरात सर्वत्र दुकानांसमोर लांबच लांब रांगा लागल्या असून ग्रामीण भागातील परिस्थिती अधिक विकट आहे. या सर्व परिस्थितीमुळे आसामात कायदा व सुव्यवस्थेची समस्याही अधिकच गंभीर बनली आहे.

आसामच्या या आर्थिक नाकेबंदीच्या प्रयत्नांमुळे आसामची आर्थिक स्थिती तर खालावलीच; पण त्याहीपेक्षा असमिया–बंगाल्यांमधील तेढ वाढीस लागली हे अधिक चिंताजनक आहे. आसामातील समस्या जितक्या अधिक काळ चिघळत राहतील तितकी ही तेढ वाढतच जाणार आहे. राजकारणी मंडळी आणि काही पत्रकार ही परिस्थिती सुधारण्याऐवजी ती अधिकाधिक बिघडवत आहेत. कलकत्त्याहून प्रसिद्ध होणारी प्रमुख वृत्तपत्रे गेल्या जानेवारीत सतत दहा दिवस आसामात सामूहिकपणे जाळली जात होती. आपल्या आंदोलनाचं विकृत वृत्त देणाऱ्या या वृत्तपत्रांविरुद्धचा संताप आंदोलकांनी या पद्धतीने व्यक्त केला. तिकडे कलकत्त्यातही याची प्रतिक्रिया उमटली! अनधिकृतरीत्या मिळालेल्या माहितीनुसार 'इलस्ट्रेटेड विकली'च्या ज्या अंकात श्री. माधव कामत यांचा 'निग्लेक्टेड आसाम' हा लेख प्रसिद्ध झाला होता त्या अंकाचे काही गठ्ठे कलकत्त्याच्या डमडम विमानतळावर काही बंगाल्यांनी जबरदस्तीने ताब्यात घेतले व त्याची होळी केली.

आसामबाहेरील प्रतिष्ठित वृत्तपत्रांनी आपल्या आंदोलनाला योग्य प्रसिद्धी दिली नाही अशी आसामातील अनेकांची तक्रार आहे. मात्र खुद्द गौहातीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'आसाम ट्रिब्यून' व 'दैनिक असम' या अनुक्रमे इंग्रजी व असमिया वृत्तपत्रांनी या आंदोलनाच्या प्रसिद्धीची आघाडी व्यवस्थितपणे सांभाळली आहे. आंदोलनातील दैनंदिन घडामोडींची भरपूर छायाचित्रांसह सविस्तर माहिती देऊन या दोन्ही वृत्तपत्रांनी आसामातील जनतेचे नीतिधैर्य राखण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे.

या आंदोलनाने राजकीय पक्षांना आपली जागा दाखवून दिली आहे. जेव्हा केव्हा हे आंदोलन संपून निवडणुका होतील तेव्हा राजकीय पक्षांवर आंदोलनाचे नेमके काय परिणाम झाले आहेत ते अधिक स्पष्ट होईल. या आंदोलनात सर्व समाज एकरूप झाला आहे व आंदोलनाला निःसंदिग्धपणे पाठिंबा देणारा एकटा जनता पक्षच आहे हे खरे असले तरी निवडणुकीत जनता पक्षालाच यश मिळेल याची खात्री नाही. याला दोन कारणं आहेत. एक तर जनता पक्षाचे अस्तित्वच धोक्यात आले आहे आणि केन्द्र सरकार ज्या पद्धतीने ही समस्या सोडवील त्या पद्धतीवर आगामी निवडणुकीतील मत-विभाजन अवलंबून आहे.

आसामातील या उद्रेकामुळे आसामच्या समस्यांची उर्वरित भारतातील सामान्य जनांना प्रथमच जाणीव झाली आहे. या निमित्ताने सबंध उपेक्षित ईशान्य भारताकडे अन्य भागातील भारतीयांचे लक्ष वेधले गेले ही स्वागतार्ह बाब आहे. निदान यानंतर तरी या भागाकडे अधिक लक्ष देऊन आसामसहित ईशान्य भारतातील अन्य राज्यांना देशाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्याचे प्रयत्न राज्यकर्त्यांकडून होतील अशी आशा आहे. अर्थात अशा प्रकारे उर्वरित भारतातील जनतेशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्यात खुद्द आसामातील जनतेनेही उत्साह दाखविला पाहिजे. या संदर्भात एक मुद्दा सांगण्यासारखा आहे. आसामातील सध्याच्या आंदोलनाचे नेते कलकत्त्याच्या पत्रकारांच्या नावाने बोटे मोडत आहेत; पण कलकत्त्याला डावलून मुंबई, मद्रास किंवा दिल्लीत जाऊन, तिथल्या पत्रकारांना भेटून, पत्रकारपरिषदा घेऊन, आंदोलनाबाबतची वस्तुस्थिती सांगण्याची कल्पकता कोणीही दाखविलेली नाही. 'या आंदोलनाबाबतची वस्तुस्थिती समोर यावी, समस्या सर्वांना समजाव्यात, निदानपक्षी अपप्रचार टळावा यासाठी आपल्यापैकी कोणीही, 'देशाच्या प्रमुख शहरांचा दौरा का केला नाही?' या माझ्या प्रश्नाला कोणीही समाधानकारक उत्तर देऊ शकलं नाही. आसाम साहित्यसभा आणि महाराष्ट्र साहित्य परिषद किंवा आसाम जनतापक्ष आणि महाराष्ट्र जनतापक्ष यांनी संयुक्तपणे काही कृती करून आसामबाहेर या प्रश्नावर जागृती निर्माण करण्यास काय हरकत होती? पण हे झालं नाही.

## पुढे काय ?

अखेर या आंदोलनाचं भवितव्य काय हा प्रश्न उरतोच. आसामातील परकीय नागरिक शोधून काढताना १९५१ वा १९७१ पैकी कोणती जनगणना-यादी अधिकृत धरली जावी हा वादाचा मूळ मुद्दा आहे; पण वाद केवळ याच मुद्द्यावर नाही. परकीय नागरिक ठरविताना घुसखोर आणि निर्वासित यांच्यात भेद करायचा की नाही? निर्वासितांना स्वीकारायचे ठरविले तर त्यांची जबाबदारी कोणी घ्यायची? परकीय नागरिकांना आसामातून घालवून दिले तरी बांगला देश सरकार त्यांना निमूटपणे स्वीकारेल याची शाश्वती काय? या नागरिकांच्या स्थलांतराची यंत्रणा कोण राबविणार? आसामचा आर्थिक मागासलेपणा दूर कसा करायचा? या आंदोलनामुळेही नव्या समस्या निर्माण झाल्या आहेत, त्या कोणी सोडवायच्या? इ. अनेक प्रश्न आहेत व तडजोडीचा अंतिम मसुदा ठरविताना उभय पक्षांना त्याचा जरूर विचार करावा लागेल. यांतील बहुसंख्य प्रश्न परस्परांशी निगडित आहेत व एकदा परकीय नागरिक म्हणजे नेमके कोण हे


## तीन राजहंस प्रकाशने

**आणि ड्रॅगन जागा झाला**

लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**मॅक्झिम गॉर्की**

लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : दहा रुपये

**पूर्णिया**

लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

ठरल्यावरच ते निर्वासित आहेत की घुसखोर हे तपासता येईल. हे सगळेच प्रश्न संपूर्णतः समाधानकारकरीत्या सुटतील अशी खुद्द विद्यार्थीनेत्यांचीही अपेक्षा नसेल. तडजोडीला त्यांचीही तयारी असणारच; पण केवळ एवढे पुरेसे नाही. ह्या संपूर्ण विषयाचा एकात्म विचार करणे ही मूलभूत गोष्ट आहे व त्याचबरोबर आसामच्या समस्या सोडविताना राजकारणातीत व वास्तववादी भूमिकेतून त्यांचा विचार करण्याची गरज उभय बाजूंनी ओळखायला हवी.

यापैकी राजकारणातीत विचार करणे ही प्रामुख्याने केंद्रसरकारची जबाबदारी आहे. अलीकडच्या घटनांवरून पंतप्रधान इंदिरा गांधी या प्रश्नापासून राजकारण दूर ठेवण्यास तयार नसल्याचेच दिसून येते. तसे नसते तर आसामच्या आर्थिक नाकेबंदीच्या प्रयत्नांना त्यांनी वेळीच आवर घातला असता आणि विद्यार्थीनेत्यांशी चर्चा करताना सरकारी अधिकाऱ्यांबरोबर यशपाल कपूर यांना निमंत्रण दिले नसते. पंतप्रधान या प्रश्नाचा राजकीय पातळीवरून विचार करीत आहेत व त्यामुळे आसामचा प्रश्न सोडविणे त्या व त्यांच्या पक्षासाठी प्रतिष्ठेचा प्रश्न बनला आहे. परिणामतः आसामात समक्ष जाण्यास त्या तयार नाहीत. ' आपल्या समस्या जाणून घेण्यासाठी आपला कोणीही वाली नाही ' ही आसामात दिसून येणारी सार्वत्रिक भावना दूर करण्याची प्राथमिक गरज आहे. पंतप्रधानांच्या आसामदौऱ्याने हे साध्य होऊ शकेल ! खुद्द पंतप्रधानांनी आसामचा दौरा केला व आसामातच विद्यार्थीनेत्यांशी चर्चा केली तर विद्यार्थीनेतेही दोन पाउले मागे सरकून तडजोडीस तयार होण्याची शक्यता आहे. अखेर मूलतः या प्रश्नाला एक भावनिक बैठक आहे व हळुवार हाताने आणि सहानुभूतीने ही निरगाठ सोडविण्याची गरज आहे.

अमुक एका भागावर सतत अन्याय होत राहिला तर त्याचे किती भीषण परिणाम होतात हे आसामच्या आंदोलनामुळे राज्यकर्त्यांना उमजेल अशी आशा आहे. राष्ट्रीय एकात्मतेसाठी आपले प्रयत्न किती अपुरे आहेत व समतोल विकासाकडे आपण किती दुर्लक्ष केले आहे, गलिच्छ राजकारणाने आपल्या समाजजीवनात किती भीषण समस्या निर्माण केल्या आहेत इ. ची यथार्थ जाणीव या आंदोलनामुळे सर्वांनाच व्हावी अशी अपेक्षा आहे. त्या दृष्टीने या आंदोलनाचे महत्त्व मोठे आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात झालेल्या विविध चळवळीत या आंदोलनाचे वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. एका अर्थानं स्वतःच्याच चुकांबद्दल आणि स्वतःवरील अन्यायाबद्दल असमिया-समाज आपण होऊन जागृत झाला, स्वतःच स्वतःच्या उद्धारासाठी पेटून उठला. लोकशक्तीच्या या प्रभावी आविष्कारापुढे राजकारण्यांच्या तोंडचे पाणी पळाले. या निमित्ताने आसाम भारताच्या मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आहे हे खुद्द आसामला व तुम्हा-आम्हालाही जाणवले, याचे महत्त्व असामान्य आहे.

सुमारे तीस लाखांहून अधिक परकीय नागरिकांना हुसकून देण्यासाठी आसामात सुरू असलेल्या या चळवळीत सबंध असमिया-समाज ढवळून निघाला आहे. या आंदोलनामुळे पुढे आलेल्या विषयांवर उभ्या भारतात एक प्रकारचं विचारमंथन घडून यावं अशी स्वाभाविक अपेक्षा आहे. ही अपेक्षा पूर्ण होण्यात सर्वार्थानं आंदोलनाचं यश सामावलेलं आहे.

समाप्त

---

**यानंतर लवकरच सुरू होत असलेली नवीन लेखमाला**

# पूर्वांचलाचे आव्हान

ले. विनय सहस्रबुद्धे

---

पुस्तके । फिनिक्स निवड

# व्हिन्सेंट व्हान गॉग

लेखक : आर्यविंग स्टोन, अनुवाद : माधुरी पुरंदरे, वितरक : राजहंस प्रकाशन, पुणे पृ. ३३८, मल्य रु. ४३.

कलाकारांची चित्रे, नृत्य, संगीत, अभिनय, वगैरे गोष्टींपेक्षा मला त्यांच्या Psyche (मन) मध्येच जास्त रस वाटतो. एकदा मी मेरिलीन फर्ग्युसन हिच्या The Brain Revolution या पुस्तकात एक मजकूर वाचला होता. तो असा–

The onset of acute Schizophrenia is Characterised by Overstimulation, Sleeplessness and Sometimes euphoric psychedelic perception. The individual is supernormally sensitive to stimuli and intergrates them rapidly. This early stage is virtually identical to the creative outbursts that have produced some of our greatest music, mathematical formulae, and art.

In full–blowa schizophrenia the heightened perception is no longer a joy but a hideous assault.

साधारणत: सामान्य माणूस सुद्धा Self–expression साठी कमीअधिक धडपडतो. पण बहुतेक सर्व कलाकारांसाठी Self–expression हे एक obsession होऊन बसतं. शरीरातले देहकण जणू शरीरात मावेनासे होतात व कुठेतरी, कसल्यातरी गोष्टीचा मागोवा घेण्यासाठी त्या शरीरातून उड्डाण करतात व त्या कलाकाराला अक्षरश: पिडून डिडून टाकतात. या देहकणांच्या तांडवनृत्यामुळेच त्या कलाकाराला जाणीव होते, की आपण अल्पायुषी आहोत आणि मग तो धसका घेतो. मृत्यूने मला गाठण्याच्या आधीच जर मी Self–expression करू शकलो नाही तर ? या भीतीने तो पिसाळतो व कलेचे एखादे माध्यम निवडून तो त्याच्या पिडलेल्या देहाला व मनाला शान्त करण्याचा प्रयत्न करतो. तो कलेच्या माध्यमातून एकदा दोनदा नाही; पण अनेक वेळा Self–expression करतो. परंतु आपण सकाळी जेवलो तरी संध्याकाळी भुकेले होतो. त्याप्रमाणे कितीही वेळा Self–expression करून त्याची भूक भागत नाही आणि शेवटी माधुरी पुरंदरे म्हणतात तसे मृत्यूच त्याला थांबवू शकतो.

मला असे म्हणायचे नाही की सर्वच कलाकार पिडलेले असतात. त्यांची पीडा कमी अधिक असू शकते. कधी कधी काही भाग्यवंत कलाकारांना पीडा अजिबात नसतेच; पण समाज त्याला genius व madness म्हणतो. त्याच्यामधील अत्यंत पातळ व पुसट रेषेपासून कमी-जास्त अंतरावर असणारे लोक हे प्रखर बुद्धिमत्ता असलेले तरी असतात किंवा समाजाच्या दृष्टीने 'वेडे' असतात. व्हिन्सेंट गॉग हा जगप्रसिद्ध चित्रकार या पातळ व पुसट रेषेभोवतीच सारखा घुटमळला. त्याने त्याच्या सत्ताविसाव्या वर्षापासून सदतिसाव्या वर्षापर्यंत जवळजवळ ८०० चित्रे काढून त्याच्या देहाच्या व मनाच्या फाडून चिंध्या चिंध्या करून टाकल्या.

असाच एकदा एक इंग्रजी ज्ञानकोष चाळत असतांना व्हिन्सेंट व्हान गॉग नावाजवळ आलो. त्याचे नाव वाचण्याच्या आधीच त्या ज्ञानकोषामधे दिलेल्या गॉगच्या सूर्यफुलाची कुंडी पाहिली व दचकलो आणि लगेच या पुस्तकाच्या अनुवादिकेचे पुस्तकाच्या सुरुवातीच्या ' मनोगत ' मधले शब्द आठवले. ' नुसती चित्रं पहाताना आपल्याला धाप लागते, पोटातनं हादरून गेल्यासारखे वाटते.' व्हॉन गॉगचे सूर्यफूल बघून मला शॉक बसला तो यामुळेच. या सूर्यफुलाच्या कागदावरील चित्रावर बोट फिरविले तर फुलावरचे Pollen उडायला लागतील इतकं रीअल हे चित्र दिसते ! क्षणभर वाटलं ही सूर्यफुलं आता मंद रीतीनं हालतील. जीव ओतओतून काढलेली ती सूर्यफुले अशी जिवंत न दिसली तरच आश्चर्य !

समारंभ किंवा पार्टीतल्या स्त्रियांची चित्रे काढणे व्हिन्सेंटला आवडत नसे; पण कामगार बायका-पुरुषांचे रेखीव स्नायू तो आनंदाने टिपत असे. हे पुस्तक वाचून मलाही झकपक पोषाखाची पोकळी जाणवली व चरबीचा लवलेशही नसलेल्या कामगारांच्या स्नायूबद्दल मलाही एक प्रकारचे कोरीव मूर्तिमय आकर्षण वाटू लागले.

अनुवादिका माधुरी पुरंदरे यांनी मनोगतात आणखीन एक खंत व्यक्त केली आहे. त्यांच्या अनुवादित पुस्तकांच्या आवृत्तीत रंगीत चित्रांच्या प्रतिकृती टाकण्याचे जमले नाही, हीच ती खंत; परंतु माझ्या 'फिनिक्स'च्या सुधारित अनुवादित आवृत्तीत मी या अडचणीवर मात केली आहे. ती अशी टाइम-लाइफ ही संस्था भलती चिकाटीची आहे. तुम्ही आयुष्यात कधीही टाइम–लाइफची वर्गणी भरली नसेल किंवा टाइम–लाइफचे पुस्तक घेतले नसेल तरी तुमच्या पत्त्यावर जाहिरातींचा अविरत भडीमार होत रहातो. याचा अनुभव काही खाजगी वाचकांना आला असेल. आमचे तर ग्रंथालय त्यामुळे आम्ही अनेक टाइम-लाइफची वर्गणी भरलेली व काही टाइम-लाइफची पुस्तकेही घेतलेली. बरं हे पत्ते रिडर्स डायजेस्ट, फॉरच्यून अशा नियतकालिकांनाही मिळतात. एकदा का जर असल्या नियतकालिकांची तुम्ही वर्गणी भरली तर तुम्ही वारल्यानंतरही तुमच्या नांवावर जाहिरातींचा भडीमार सुरू राहील. काय पण चिकाटी !

Sorry for digression–तर या टाइमलाईफकडून येणाऱ्या अनेक पत्रकातून काही वर्षांपूर्वी दोन-तीन वेळा The World of Van Gogh या पुस्तकाची माहिती आली होती. त्यांनी पाठविलेल्या घडीबंद कागदात व्हिन्सेंटची काढलेली तीन-चार रंगीत चित्रे होती. त्यातली काही मी Lust For Life या आर्यविंग स्टोनच्या मूळ इंग्रजी पुस्तकात डकवून टाकली व जादा चित्रे कधी काळी

कुणी मराठी अनुवाद किंवा रूपांतर करेल किंवा त्या पुस्तकांची मी दुसरी कॉपी घेईन तेव्हा उपयोगात येतील या आशेने ठेवून दिली. आता माधुरी पुरंदरेंनी माझी इच्छा पूरी केली व या टाइम-लाइफच्या जाहिराती घडीबंद कागदातून मराठी आवृत्तीवर चिकटवून टाकल्या. Time–Life चे Van Gogh (किमान रु. १५० च्या आसपास) हे पुस्तक विकत न घेता त्यांची मी फिरकी घेतली ती अशी. त्यात सनफ्लॉवर्स, सेल्फ पोर्टेट व त्याच्याच आयुष्याची जशी चोहो-बाजूंनी नाकेबंदी झाली तसेच त्याचे 'व्हीट-फील्ड' ही तीन चित्रे आहेत. व्हिन्सेंट व्हान गॉग हा पोस्ट इंप्रेशनिस्ट डच पेंटर १८५३ साली जन्मला. त्याने १८९० साली आत्महत्या केली. पॅरिसमध्ये तो १८८६ साली गेला. तेव्हापासून त्याची चित्रकला परिपक्व झाली. पॅरिसमध्ये जाण्यापूर्वी डोळे दिपून जावे इतक्या गडद रंगांनी तो चित्र काढीत असे. १८८६ पासून मात्र त्याचे टेक्निक Light impressionist झाले. क्युबिस्ट पिकासोची 'ग्वार्निका', '३४७ ग्रेव्युर्स', ही चित्रे जशी जगप्रसिद्ध आहेत. तशीच व्हिन्सेंटची 'सनफ्लॉवर्स', 'द पोर्टेटो इटर्स' ही प्रसिद्ध आहेत. उभी हयात कफ-ल्लक रहाणाऱ्या व्हिन्सेंटच्या एका चित्राची किंमत आता कित्येक लक्ष रुपयात आहे. मृत्यूनंतर इतके नाव व पैसे मिळवलेला चित्रकार एकदा स्वतःला उद्देशून म्हणाला होता, "One may have a hearth inside one's heart and yet obnody will come and sit by it." तो किती उमदा व एकाकी होता हे या वाक्यावरून उघड आहे. इथे आपल्याला परत निर्दय नियतेची जीवघेणी मानगुटी पकड बघावयास मिळते. काफकासारखी त्याच्या हयातीत व्हिन्सेंटला सतत अवहेलना व अपमान सहन करायला लावून जणू पुढे नियती म्हणते, "You have seen the programme of Vincent 'Von Gogh suffering humiliation so many times. Gentlemen, Please stand by to watch his next humiliation, which follows in a few days."

मला इथे एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते ती ही की, **मूळ इंग्रजी पुस्तकाची लोकप्रियता ही चित्रकलेमुळे नसून व्हिन्सेंट व्हॉन गॉग या माणसामुळे आहे.** अर्थात् गॉग व चित्रकला यांचे दोन भाग करणे कठीण आहे; परंतु या पुस्तकाच्या जगांतील असंख्य वाचकांना चित्रकलेविषयी काही माहिती नाही. मलाही नाही, तरी पण हे माझे आवडते पुस्तक आहे असे मी 'माणूस' मधील काही वर्षांपूर्वीच्या माझ्या मुलाखतीत सांगितलेच होते. किंबहुना या पुस्तकाचा मराठी अनुवाद करावा अशी आशा मी उराशी बाळगून होतो; पण मला त्या वेळेला मराठी फारसे अवगत नव्हते व माझ्या डोळ्यांसमोर अतिपरिश्रमाने केलेल्या अनुवादाच्या कागदाच्या थप्पीच्या थप्पी दिसू लागल्या व त्याबरोबर प्रकाशकाची रिजेक्शन स्लीपही. लेखकाला किंवा अनुवादकाला जगात सर्वात अप्रिय वस्तू असेल तर ही रिजेक्शन स्लीप!

कोणताही अनुवाद करणे ही सोपी गोष्ट नाही. मला तर वाटते एखादी कादंबरी लिहिणे सोपे जाईल; परंतु अनुवादाचे काम अवघड व thankless. अमकं सांगताना, तमक्याचं वर्णन करताना मूळ लेखकाला काय अभिप्रेत असेल याचा विचार अनुवाद-काला सारखा करावा लागतो. कधी कधी या विचाराच्या गुंतागुंतीने अनुवादक जेरीस येतो. अनुवादित साहित्याला रेखीव व ठस-ठशीत सीमा आखलेल्या असतात. कळत नकळत व परत परत अनुवादक या सीमेवर येऊन ठेपतो व त्या मर्यादेने तो भांबावून जातो. कोणत्याही अनुवादाविषयी हे असे तर मग व्हिन्सेंट व्हान गॉग च्या जीवनावर आधारित कादंबरीचा अनुवाद निश्चितच अवघड झाला असेल. अनुवादिकेचे उच्चार चुकले वगैरे, असे आरोप करणे सोपे आहे; पण शेवटी एकच प्रश्न महत्त्वाचा असतो. मूळ कादंबरीचा आशय, व्हिन्सेंट व्हान गॉग-सारख्या उपेक्षित व फाटलेल्या व्यक्ति-मत्त्वाच्या माणसाचे चित्रण, हे नीट जमले आहे का? माधुरी पुरंदरे या माणूस परि-वारातील आहेत म्हणून मी हे सांगत नाही; परंतु माधुरी पुरंदरे यांनी अनुवाद चांगलाच वाचनीय केला आहे. मूळ कादंबरीचा आशयही पुष्कळ प्रमाणात उतरला आहे.

इंग्रजीमध्ये Lust For Life सारख्या उत्कृष्ट कादंबऱ्या किती तरी आहेत की ज्यांची माहिती काही मराठी वाचकांना नाही. The Outsider, Beware of pity, Dr. Zivago, Zorba The Greek, Dostovesky अशा शेकडो इंग्रजी क्लासि-क्सचे भाषांतर मराठीत करावयास हवे. लिहिणे हे रक्तात भिनते. एक वेळ माणूस धूम्रपान व pot सोडू शकेल; पण लिहिणे नाही. अनुवादाचेही थोडे तसेच. तर माधुरी पुरंदरे व इतर जिद्दी अनुवादकांनी या इंग्रजी क्लासिक्सचे मराठी अनुवाद जाणकारांच्या टीकेला बळी न पडता जरूर करावेत. बाकी काय तर जेम्स हॅडले चेस, गॉडफादरसारखे अनुवाद निघतातच.

हा अनुवाद व इंग्रजी मूळ प्रत प्रत्येक चित्रकला विद्यालयात तर हवीच; पण या दोन प्रती सर्वसामान्य ग्रंथालयातही संग्रही हव्यात.

एकदा व्हिवियन ली या नटीने शॉला विचारले होते की, क्लिओपात्रासारखी मोठी भूमिका तिला पेलेल का? या वेळी शॉमहाशय दाढी कुरवाळीत उत्तरले, "क्लिओपात्राची भूमिकाच अशी आहे की शेवटी ती स्वतःच अभिनय करायला लागेल." आर्यविंग स्टोनलासुद्धा शॉसारखी वल्गना करावयाची सवय असती तर "अनुवाद आपोआप होईल" असंच टक्कलावर हात फिरवीत ते म्हणाले असते!

पुस्तकाची छपाई व कव्हर सुरेख आहे. ब्लडरेड अक्षरामधले टायटल व sorrow नावाचे चित्र दुर्दैवी व्हिन्सेंट व्हान गॉगशी निगडित वाटतात.

— जे. एन्. पोंडा


# व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका
**माधुरी पुरंदरे**

प्रकाशक
**प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे**

## बगाड

पृष्ठ ८ वरून

पण चापेकर हे प्रतिगामी, सनातनी आणि पुनरुज्जीवनवादी होतेच ! अहो, ते टिळकांना सुद्धा धर्मलंड मानीत !

खरं आहे. आम्ही ते अमान्य करीतच नाही. रँड अत्याचारी नसता, परकी सत्तेचा जुलूम सहन करण्यापलीकडे गेला नसता आणि चापेकरांनी केलेले वध तत्कालीन समाजाच्या सर्व थरांनी उत्स्फूर्तपणे निषेधार्ह मानले असते तर चापेकरांचे सनातनित्व ठसविण्यात काही अर्थ होता; पण चापेकर सनातनी असले तरी ते विसरून साऱ्या समाजाने त्यांना वधकरी न मानता हुतात्मा मानले हे लक्षात ठेवले पाहिजे! आज चापेकर त्यांच्या उज्ज्वल हौतात्म्यानं स्मरणीय ठरतात, सनातनी कडवेपणामुळे नव्हेत ! हौतात्म्याचा संदर्भ लक्षात आणला की तुमच्या ध्यानात येईल की चित्रपटाने अधोरेखित केलेले चापेकरांचे सनातनधर्माविषयीचे प्रेम केवळ वास्तवतेच्या हव्यासाने अधोरेखित केलेले नाही. त्यात कुत्सितपणाही आहे. चित्रपटाच्या शेवटी वासुदेव रामा पांडूवर गोळी झाडतो ती रामा पांडू 'साला बम्मनका बेटा' असे म्हणतो तेव्हा. खरे पाहता 'कंठस्नान आणि बलिदान' मध्ये लिहिले आहे की, 'चापेकर तेवढे साले हरामखोर' असे रामा पांडू म्हणाला तेव्हा वासुदेवाने गोळचा झाडल्या. तेव्हा सगळा भर कशावर आहे, ते लक्षात घ्या !

पण चापेकर हवेत तसे रंगवायला नकोत का ?

चापेकर सनातनी होते, ब्राह्मण्याचे अभिमानी होते, इंग्रजी सत्तेविरुद्ध त्यांना वाटणारा त्वेष आधुनिकतेवर त्यांचा जो रोष होता त्यापासून निराळा करता येण्याजोगा नव्हता हे सर्व मला मान्य आहे आणि ते दाखवायला माझा विरोध नाही; पण चापेकर केवळ एवढेच नव्हते. इंग्रजी राजवटीचा उर्मटपणा आणि अरेरावी, समाजाची सुखासीनता आणि स्थाणुत्व, यावर त्या दशकात झालेले दुष्काळ, प्लेग आणि दंगे यांचे आघात, टिळक आणि शि. म. परांजपे यांनी उसळविलेला असंतोष यांचा संदर्भही मग पुऱ्या तपशिलानिशी रंगवायला हवा आणि चापेकर खुनी न ठरता हुतात्मे का ठरले हेही पटवून द्यायला हवं. ते न करता नुसते चापेकर रंगवणं म्हणजे त्यांना खुजं करणं आहे ! *

---

# २२ जून १८९७ : चित्रपट का कोसळतो ?

प्रा. प. वि. पटवर्धन

'राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कार करणारे' चित्र म्हणून या पटवर्धन पतिपत्नींच्या चित्राला नुकताच राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. तसेच सौ. जयूताईंनाही त्यातील 'कलादिग्दर्शना'बद्दल पारितोषिक मिळाले आहे. त्याबद्दल दोघांचे अभिनंदन करतो आणि या चित्रपटाविषयी माझे मत प्रतिकूल का झाले ते थोडक्यात सांगतो.

प्रथमच हे मान्य केले पाहिजे की, विषय चमत्कृतिपूर्ण, नवा, कोठल्याही प्रकारचे राजकीय दडपण न येता हाताळता येण्यासारखा निवडल्याबद्दल श्री. नचिकेत पटवर्धन यांचे अभिनंदन करावयास पाहिजे. मात्र असा विषय निवडल्यानंतर त्यातील प्रमुख आशय प्रेक्षकांपर्यंत यथोचितपणे पोचविण्याची जबाबदारी दिग्दर्शक-निर्माते यांजवर येऊन पडते. त्यातच चित्रपट ऐतिहासिक असला तर यथातथ्य ऐतिहासिक पार्श्वभूमी निर्माण करणे हेही ओघानेच येते. रँडच्या वधासारखी राजकीय सामाजिक त्वेषातून निर्माण झालेली घटना निवडली म्हणजे आणखी त्या त्वेषाचा परिपोष करणाऱ्या घटना व त्या घटनेची 'राजकीयता' व 'सामाजिकता'—याही बाबी महत्त्वाच्या होतात आणि हे सर्व संशोधनपूर्वक यथास्थित आणि प्रेक्षकांवर योग्य तो परिणाम होईल या दृष्टीने करावयाचे म्हटले की, पैशाचे भरपूर पाठबळ असल्याशिवाय ते शक्य होणार नाही आणि म्हणूनच सरकारी पारितोषिके मिळालेल्या या चित्रपटाच्या बाबतीतसुद्धा असे म्हणावे लागते की, पैशाच्या अभावामुळे किंवा अपुऱ्या साधनसामुग्रीमुळे या चित्रपटाची शोकांतिका झाली आहे ! नुसत्या उत्कृष्ट अभिनयावर, कथेच्या निवडीवर किंवा मनातील स्वप्नांवर प्रेक्षकांची पसंती मिळविणे हे कोणत्याही दिग्दर्शकाला शक्य नाही ! यशस्वी चित्रपट हा अनेक गोष्टींचा परिपाक असतो. त्या समुच्चयात काही विशेष बाबींकडे दुर्लक्ष झाले तर चित्रपट कोसळतोच ! या उत्तम कल्पिलेल्या पण अत्यंत तोकडेपणाने हाताळलेल्या ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय चित्रपटाचे नेमके तेच झाले आहे !

हा चित्रपट सुमारे नव्वद वर्षापूर्वी घडलेल्या एका राजकीय घटनेवर आधारित आहे. ती घटना पुण्यासारख्या मुंबई इलाख्याच्या उन्हाळी राजधानीतल्या शहरात घडलेली व तिचे राजकीय पडसाद दोन-तीन वर्षे धुमसत राहिलेले ! आचार्य जावडेकर यांनी आपल्या 'आधुनिक भारत' या ग्रंथात म्हटलेले आहे—'या घटनेने सर्व भारताला हादरा बसला !' या घटनेशी असणाऱ्या संभाव्य संबंधावरून लों. टिळकांसारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या पुढाऱ्याला शिक्षाही झालेली ! रँडसाहेबांचा खून ही घटना काही दामोदर चापेकर यांच्या कुटुंबियांच्या घरी, कुठल्या तरी कोपऱ्यातल्या विरळ वस्तीच्या भकास खेड्यात झालेली नाही. तसेच, त्या 'वधा'चे कारणही वैयक्तिक हेवादावा किंवा सूडबुद्धी हे नसून परकीय सरकारच्या जुलूमजबरदस्तीबद्दलची सूडाची भावना हे आहे. रँड हा प्लेग-कमिशनर नेमला होता आणि त्याच्या अमलाखाली, प्लेगच्या भयंकर कहरात ब्रिटिश सोल्जरांनी क्वारंटाइनच्या नावाखाली केलेले भयंकर अत्याचार आणि

व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाच्या हीरकमहोत्सवप्रसंगी गोऱ्या गव्हर्नराची पुणे राजधानीत चाललेली चैन व आतषबाजी यामुळे पुणेकरांत झालेला प्रक्षोभ— यातून दामोदर चापेकर आणि त्याचे भाऊ यांना—या अत्याचारांचे प्रतीक आणि उत्तराधिकारी जे गोरे अधिकारी यांचे खून करण्याची बुद्धी झाली. या सर्व गोष्टी यथोचित दिग्दर्शित झाल्या तरच हा चित्रपट यशस्वी होणार होता. या चित्रपटात वधाच्या घटनेला महत्त्व होतेच; पण अधिक मोठे महत्त्व त्या घटनेकडे दामोदर चापेकर आणि त्याच्या बंधूंना नेणाऱ्या परिस्थितीच्या रेटचाला होते. तो परिस्थितीचा रेटा जर यथातथ्य निर्माण झाला नाही तर लोकक्षोभाची जाणीव होणार नाही आणि लोकक्षोभाचे यथोचित दर्शन घडले नाही तर खुनासारख्या आत्यंतिक पर्यायाच्या स्वीकाराचे समर्थन तर राहोच—स्पष्टीकरणही होऊ शकणार नाही. म्हणून या चित्रपटाच्या कथानकातील परिस्थितीच्या रेटचाला व त्याच्या यथातथ्य दर्शनाला आगळे महत्त्व आहे.

रँडचा खून का करण्यात आला ? दामोदर चापेकर यांच्या घरावर धाड पडली आणि त्यांची माणसे आणि भांडीकुंडी बाहेर काढली म्हणून नाही किंवा चापेकरबंधूंना केवळ सैन्यात ब्राह्मण म्हणून प्रवेश नाकारला म्हणूनही नाही. दामोदर चापेकर किंवा त्यांच्या कुटुंबाची वैयक्तिक हानी किंवा होरपळ या गोष्टी महत्त्वाच्या नाहीत. तो सार्वत्रिक जुलुमाविरुद्ध चिडलेल्या संतप्त तरुणाने केलेला अंतिम निषेध होता. सर्व समाजालाच त्या प्लेगविरुद्धच्या मोहिमेत गोऱ्या जुलमी सत्तेचा त्रास होत होता. तो जुलूम, त्या वेळी ब्रिटिश सत्तेला चढलेला माज व नेटिवांच्याबद्दलची तुच्छता यामुळे महाराष्ट्रभर—किंबहुना हिंदुस्थानभरही—परकीय सत्तेबद्दल चीड निर्माण झालेली होती. तिच्यावरचा प्रक्षोभ, राग ह्या हत्येने व्यक्त झाला. तेव्हा जुलमाचे दिग्दर्शन जितके अधिक वास्तव, प्रत्ययकारी, व्यापक, सामाजिकतेवर आधारलेले तितका लोकांचा प्रक्षोभही अधिक सयुक्तिक वाटणार आणि 'वधा'च्या वेडाने पछाडलेल्यांच्या 'वेडा'चे रहस्य प्रेक्षकांना कळणार !

दुर्दैवाने याच बाबतीत हा चित्रपट पुरता कोसळला आहे. ब्रिटिशांच्या जुलुमाची व्यापकता-सार्वत्रिकता, त्याची सामाजिकता-यांचा मागमूसही या चित्रपटात कोठे दिसत नाही. चित्रपट दूर कोठे तरी खेड्यात काढलेला दिसतो. त्यात प्लेगच्या साथीची उग्रता, गोऱ्या पलटणींचा धुमाकूळ, लोकांचे निषेध, ब्रिटिश अधिकाऱ्यांचा उन्मत्तपणा कोठे दिसतच नाहीत ! ब्रिटिश सम्राज्ञीच्या मुकुटातील हिरा जो हिंदुस्तान तेथील ब्रिटिशांच्या मिजासखोर रियासतीचे ४।२ शिपुर्डे आणि १।२ नेभळट अधिकारी यांच्या रूपात भिकार दिग्दर्शन करून, ब्रिटिश राजकर्त्यांचा, असा नाही तर तसा सूड चित्रपटनिर्मात्यांनी सूड घेतला आहे की काय असे वाटते !

या चित्रपटातील घटना पुण्यासारख्या गजबजलेल्या आणि राजकारणात प्रगल्भ असलेल्या शहरात घडल्या आहेत असे चित्रपट पाहून आलेल्या कोणालाही वाटणार नाही. या वधाच्या घटनेपूर्वीची व नंतरची खळबळ या चित्रपटात कोठेही दाखविण्यात आली नाही. रँडच्या वधाला कारणीभूत झालेली मुख्य घटना म्हणजे पुण्यातील प्लेगाचा कहर व त्याच्या निरसनार्थी उपाययोजनेत पुण्यात ब्रिटिश सोजिरांनी घातलेला सत्तेचा धुडगूस ही होय. पुण्यातील प्लेगच्या जुलमासंबंधी त्या वेळी वेल्वी कमिशनपुढे साक्ष देण्यास लंडनला गेलेल्या नामदार गोखले यांच्यासारख्या नेमस्त पुढाऱ्यानेही लंडनच्या टाइम्समध्ये पत्रे लिहून ब्रिटिश जनतेचे लक्ष या अत्याचारांकडे वेधून घेतले होते ! (पुढे हिंदुस्थानातील मवाळ पुढारी पुरावा देण्यास कचरले म्हणून गोखल्यांना टाइम्सकारांची माफी मागावी लागली हा भाग सोडून द्या !) ह्या प्लेग ही सुद्धा अंगावर काटा आणणारी घटना होती. दररोज ५०।६०, काही दिवस तर शेकड्यांनी माणसे मरत असत. त्यात गोऱ्या आणि काळ्या सोजिरांच्या पलटणी रस्त्यात आणून ब्रिटिश सरकार पाशवी सत्तेचे प्रदर्शन अत्यंत हिडिसपणे करीत होते. चित्रपटात हा भाग अत्यंत असमाधानकारक रीतीने दाखविला आहे ! एक-दोन प्रेते — पाच-सहा जणांची 'रामबोलो'ची प्रेतयात्रा—धडधडणाऱ्या चिता नाहीतच—एक-दोन शिपुर्डे एका घरात घुसतात—एक-दोनच कपडे चुरगळलेले ब्रिटिश अधिकारी दिसतात—सार्जंट्स् तर कोठेच नाहीत — ८।१० भांडीच घराबाहेर फेकली जातात — एखाददुसरीच शिवी ऐकू येते — व एखाददुसरीच लाथ बसलेली दिसते ! खरोखर हा 'जुलूम' इतक्या हळुवार रीतीने हाताळला आहे की ब्रिटिश सत्तेबद्दल तिटकारा येण्याऐवजी सूक्ष्म, कळत—नकळत आदरच वाटावा ! (प्रस्तुत लेखकाला ब्रिटिशांच्या सौजन्याची तरफदारी करणारे काही प्रेक्षक भेटलेही !) बस इतकेच—कोठे सभा राहोतच—बैठकीही नाहीत—गुप्त चर्चा नाहीत — कोठे वर्तमानपत्रांतील बातम्या नाहीत — स्फुट लेख नाहीत— ! कोठे पलटणीच्या पलटणी रस्त्यातून हिंडलेल्या दाखविल्या नाहीत ! पुण्याचे जे दर्शन घडविले आहे ते वाईसारख्या खेड्याच्या स्वरूपात ! सुमारे ८०।९० वर्षांपूर्वी सुद्धा पुण्याची बुधवार पेठ, शनिवार पेठ, सदाशिव, नारायण, रविवार, शुक्रवार — या पेठा गजबजलेल्या होत्या — शहराचा विस्तार लहान असला तरी वस्ती दाटीची होती—प्लेग, जुलूम, खून, सरकारी फौजा पुण्यावर 'लादणे'—त्यांचा धिंगाणा— या गोष्टींनी निर्माण झालेली खळबळ कोठेच दिसत नाही. याचे कारण संपूर्ण अनुचित Location ची निवड हेच होय — पुण्याचे ८०।९० वर्षांचे स्वरूप दाखविण्यासाठी एखाद्या पेठेचे प्रतीकात्मक दर्शन तरी मोठ्या स्टुडिओमध्ये एखादे सेटिंग उभे करून करता आले असते—नव्हे करावयासच पाहिजे होते. ही घटना पुण्यासारख्या राजकीय जाण असलेल्या शहरात होत आहे हे प्रेक्षकांपर्यंत पोचवण्यात चित्रपटाच्या अंतिम यशाचा भाग होता. त्याचप्रमाणे, ब्रिटिश पाशवी सत्तेचे चित्रीकरण एक-दोन कृत्रिम सोजिरांकरवी होणेच शक्य नाही ! त्याच्याकरता एक-दोन पलटणी तरी गजबजलेल्या रस्त्यांतून दिमाखाने बूट हापटीत चाललेल्या दाखवावयास पाहिजेच होत्या. अर्थात हे सर्व करण्यास पैशाचे पाठबळ पाहिजे होते; पण अशा सामाजिक—ऐतिहासिक आशय असलेल्या चित्रपटाला हात घालावयाचा तर असा खर्च करावयाची तयारी पाहिजे.

त्याचप्रमाणे ज्या रात्री दामोदरने रँडचा खून केला, त्या रात्रीच्या घडामोडीचे चित्रण तर अगदी पोरकट झाले आहे. वास्तविक ह्या घटना म्हणजे कथानकाचा Climax होता

व त्यामुळे प्रेक्षकांचे Tension पराकोटीस पोचावयास पाहिजे होते ! पण तसे काहीच होत नाही...खरोखर राणीच्या राज्यारोहणाच्या हीरकमहोत्सवी समारंभाच्या रंगेल पार्टीची पार्श्वभूमी या घटनेला आहे. ती रंगेल, धुंद पार्टी मदिरापानाच्या आणि बॉलरूम डान्सेसच्या काही दृश्यांनी तरी सूचित करावयास हवी होती. वास्तविक पुणे विद्यापीठाचा दरबार हॉलच (जेथे ही पार्टी झाली) त्यातील झुंबरांसह यासाठी वापरता आला असता. विजेच्या दिव्यांची अडचण Special effects च्या किमयेने दूर करता आली असती. म्हणजे इकडे प्लेगच्या कहरातून लोक नुकतेच बाहेर पडत आहेत, तोच तिकडे राज्यकर्ते नाचरंगात मश्गुल आहेत असे दिसून ब्रिटिश सत्तेबद्दलच्या क्रोधात अधिक भर पडली असती; पण प्रत्यक्षात, फक्त एकदा दरबार हॉलच्या बाहेरच्या दगडी भिंती दाखवून व खुद्द पार्टीच्या वेळी संगीताचे स्वर ऐकवून या बड्या पार्टीची सूचना देण्यात आली आहे ! पण त्यामुळे "Rome burns while New fiddles" ही ब्रिटिशवृत्ती दिसावयास हवी होती ती दिसू शकली नाही आणि हे सर्व अगदी एक-दोन शॉट्समध्ये भरंकन्-फारसे फूटेज-न घालविता दाखविता आले असते; पण येथेही पैशाची अडचण आली असली पाहिजे !

प्रत्यक्ष खुनाचे चित्रणसुद्धा अशक्यकोटीतील साधेपणाचे वाटते. दामोदरपंताने बग्गीच्या मागून चढून रँडचा खून केला—याला जरी काही ऐतिहासिक आधार असला, तरी त्याची बग्गीवरील चपराश्यांशी मारामारी झालेलीही दाखविली नाही. एक म्हणजे बग्ग्या व ग्रामगाड्यांमध्ये पुढे कोचमनशेजारी एक हुजऱ्या व मागील दोन चाकांमध्ये एक फळी असे, त्यावर दोन चपराशी किंवा शिपाई साधे सरदारही नेत असत. मग 'त्या' रात्री रँडसारखा 'प्लेगकमिशनर' या खास हुद्द्यावर असणारा अधिकारी, खुनाची धमकी मिळाली असता, अपरात्री रक्षकाशिवाय बाहेर पडेल हे संभवत नाही. तेव्हा दामोदराची अशा रक्षकांबरोबर झटापट झालेली दाखविणे सयुक्तिक झाले असते. अर्थात दामोदराने पाठीला पिस्तुल टेकवून खून केल्याचे दाखविणे हे सुद्धा पटत नाही; परंतु याबाबत दिग्दर्शकाला संशयाचा फायदा देऊ या.

प्रत्यक्ष खुनानंतर पुण्यातील जुलूम, धरपकड, रात्री-अपरात्री दारावर थाप, दहशतवाद आणि अत्याचार यांचेही काही विशेष दर्शन – जे प्रेक्षकांना अपेक्षित असते – ते घडत नाही. सभा, चर्चा, वर्तमानपत्रातले उतारे–त्यांचे मथळे तरी–दाखवून हे करता आले असते. याच जुलुमाला कंटाळून लोकमान्य टिळकांनी आपले दोन सुप्रसिद्ध अग्रलेख लिहिले होते. ते म्हणजे 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ?' आणि 'राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे–' हे होत ! पुढे ह्याच लेखांतील मजकुराबद्दल सरकारने टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरून, त्यात त्यांना शिक्षा व्हावी म्हणून 'सरकारबद्दल अप्रीती निर्माण करणे' हा सुद्धा राजद्रोहात्मक गुन्हा असल्याची सुधारणा करून, त्यांना दीड वर्ष तुरुंगात पाठविले ! आणि या घटनेने सर्व हिंदुस्थानला 'हादरा बसला !' असे आचार्य जावडेकरांनी म्हटले आहे. पुण्यातही प्रचंड खळबळ माजली होती. तिचे सूचक दिग्दर्शनही कोठेच आढळत नाही !

किंबहुना टिळकांची जी प्रतिमा पडद्यावर दिसते ती अगदीच निराशाजनक दिसते. त्यांचे घरही–एका विद्वानाचे, देशभक्ताचे, गणित्याचे, केसरीच्या संपादकाचे-अगदी ओकेबोके दिसते ! ना ग्रंथसंपत्ती–ना वर्तमानपत्रांच्या फायली–ना माणसांची वर्दळ ! किंबहुना टिळक कोठे तरी खेड्यातच राहात असावेत असे वाटते ! टिळकांच्या घरची माणसांची जा–ये वर्दळ–झरकन एक दोन शॉट्समध्ये दाखविता आली असती आणि प्रेक्षकांच्या मानसिक परिणामाच्या दृष्टीने ते आवश्यक होते. आता ही पुण्यातील धावपळ, सामाजिक जाण, समाजातील हेलकावे–हे कसे दाखवावे हे पटकथालेखकाने आणि दिग्दर्शकानेच ठरवावयाचे असते. समीक्षक 'ते कमी पडले' एवढेच सांगू शकेल. पर्याय सुचवू शकेल असे नाही. अर्थात येथेही साधनसामग्रीचा व पैशाचा प्रश्न निघण्याचा संभव आहे; पण अशा विषयाला हात घालावयाचा म्हणजे ही बाजू सांभाळावयास हवीच !

आणखी एक हास्यास्पद गोष्ट–राज्यारोहणसमारंभाचे दारूकाम–जे पाहाण्याच्या मिषाने वासू चापेकर 'थांबलो आहे' असं सांगतो, ते इतके मामुली आणि तोकडे आहे की, येथेसुद्धा दिग्दर्शकाच्या मनात भिकार दारूकाम दाखवून ब्रिटिशांची फजिती करण्याची कल्पना असावी ! प्रेक्षक काही तरी–क्षणभर का होईना–चांगली Fire works बघण्याची अपेक्षा करतात–पण तसे काहीच होत नाही; धाकटा चापेकर म्हणतो–'हा त्यांच्या बापाचाच पैसा आहे की नाही–' आणि थुंकतो ! हे वाक्य त्याच्या तोंडी येण्यास ब्रिटिश लोक प्रचंड पैशाचा धूर करत आहेत असे निदान सुचवायला तरी पाहिजे होते !

तसेच पुण्यातील 'डांबरी रस्ते'–टाळावयास पाहिजे होते. एक-दोन ठिकाणी Close–up मध्ये आधुनिक Hair cut (शेंडी शेजारी) दिसतात–तेही खटकते ! दामोदरपंत फाशी गेल्यावर साग्रसंगीत 'न्हाण' आल्याचा सण दाखविणेही प्रशस्त वाटत नाही. निदान चापेकरांचे जे प्रेमळ 'एकत्र कुटुंब' दाखविले आहे. त्यात तरी हे बसत नाही.

एकूण थोडेसे कल्पनादारिद्र्य, साधनसामुग्री व पैसा यांचा खूपच अभाव, रँडच्या वधाच्या राजकीय व सामाजिक संदर्भाचे अनाकलन यांमुळे चित्रपट मनावर ठसतच नाही आणि सर्वच पात्रांचा अभिनय उत्तम असूनसुद्धा–हा दुर्दैवी परिणाम भोगावा लागत आहे ! संवाद, ध्वनिमुद्रण आणि छायाचित्रण यासंबंधी विशेष उत्साहाने लिहिण्यासारखे काही नाही. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा
**मॅक्झिम गॉर्की**
**सुमती देवस्थळे**
मूल्य दहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# श्रद्धांजली

पृष्ठ २ वरून

मूल होऊन जाणारा रवी, पत्नीच्या मृत्यूनंतर सुन्न, दगड बनलेला रवी किंवा सिंहासनमधील सतत जीवनमरणाचा जुगार खेळताना एका प्रचंड ताणाखाली वावरणारा पानिटकर किंवा २२ जूनमधील "विश्वासघात करायलाही हिंमत लागते." असं म्हणणारा गणेश द्रविड–ही सगळी एकाच जयरामची रूपं होती आणि या खऱ्या वाटणाऱ्या खोटया रूपांप्रमाणंच एक खराखुरा दिलदार जयरामही होता–भेटल्यावर छातीत गुद्दा व पाठीत धपाटा हाणणारा, आपुलकीनं चौकशी करणारा, दिलखुलास गप्पा मारणारा जयराम !

बऱ्याच काळानंतर मराठी रंगभूमीला आणि चित्रपटाला लाभलेल्या या तरुण, देखण्या आणि समर्थ अभिनेत्याकडं सारेच जण अत्यंत आशेनं पाहत होते; पण नुकताच क्षितिजावर उगवलेला हा तेजस्वी तारा अकालीच निखळून पडला ! आलापीची सुरुवात होते न होते तोच मैफल विस्कटली. वास्तवाच्या जागेपणी एक सुरेल स्वप्नगाणे संपले !

–सदानंद बोरसे

# डोंगराची हाक !

अश्विन पुंडलीक या महाराष्ट्राच्या ख्यातनाम खोखो–खेळाडूचे आठ मार्चला अपघाती निधन झाले. केवळ अठरा वर्षांच्या अश्विनने खोखोप्रमाणेच बास्केटबॉल, नौकानयन आणि गिर्यारोहण या खेळांमध्येही प्राविण्य मिळविले होते. इंजिनियरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिकणारा अश्विन अभ्यासातही 'स्कॉलर' म्हणून प्रसिद्ध होता. अशा या चतुरस्र आणि अत्यंत साहसी क्रीडापटूला सिंहगडावरील एक अवघड कडा चढताना खाली कोसळून मृत्यू आला! त्याला श्रद्धांजली वाहण्याच्या हेतूने पुण्यातील फ्रेन्डस् ऑफ ॲनिमल्स् सोसायटी आणि पुणे माउंटेनियर्स या दोन संस्थांनी तीन एप्रिलला एक कार्यक्रम आयोजित केला होता.

पुणे माउंटेनियर्सने गेल्या वर्षीच्या जुलै–ऑगस्टमध्ये फक्त मुलींचा समावेश असलेल्या एका पथकाची हिमालयातील २१ हजार फूट उंचीचे मुल्किला हे शिखर सर करण्यासाठी मोहीम आयोजित केली होती. श्रीमती उषा भिडे–साठे यांनी या मोहिमेचे नेतृत्व केले होते. त्या वेळी उषाताईंनी घेतलेल्या छायाचित्रांवरून बनविलेल्या रंगीत स्लाइडस् या कार्यक्रमात दाखविण्यात आल्या. नंतर हिमाचलप्रदेशाचे प्राकृतिक सौंदर्य आणि लोकजीवन टिपणारे दोन सुंदर लघुपटही या वेळी दाखविण्यात आले.

गिर्यारोहण ह्या क्रीडाप्रकारात साहस आणि सौंदर्य या दोन्हींचा आगळा आनंद खेळाडूंना लुटता येतो. इतर खेळांप्रमाणे प्रेक्षकाची भूमिका घेऊन हा आनंद लुटण्याची सोय या खेळात नसली तरी अशा स्लाइडस् शोमधून ही उणीव पुष्कळ अंशी भरून निघते, असे हा कार्यक्रम पाहून वाटले. म. फुले वस्तुसंग्रहालयाच्या सभागृहात दाटीवाटीने जमलेल्या दोनशे किशोर व तरुण मुलामुलींनी जिवंत वाटणाऱ्या रंगीत स्लाइडस् आणि उषाताईंचे निवेदन यांच्या सहाय्याने मुल्किला मोहिमेतील काही रोमांचक्षण समरसून अनुभवले असे म्हणायास हरकत नाही.

गिर्यारोहण म्हटले म्हणजे साहस हे आलेच. लढाईत जसे थोडक्याशा चुकीनेही जिवावरच बेतते तसेच गिर्यारोहणातही. बारीकशी चूकसुद्धा या खेळात जीवघेणी ठरू शकते. म्हणूनच परमोच्च साहसाचा आनंदही याच खेळात मिळतो आणि जेव्हा मुली या खेळात पराक्रम करून दाखवितात तेव्हा ती विशेषच कौतुकाची गोष्ट !

हिमाचलप्रदेशातील मध्य लाहौलच्या पर्वतराजीमध्ये मिलांग आणि कोआ डोंगरांची एक रांग आहे. या रांगेतील मिलांग डोंगराच्या दहा शिखरांपैकी मिलांग ४ ( उंची २१३८० फूट ) आणि ते न जमल्यास मिलांग ५ ( उंची २१००० फूट ) हे शिखर सर करणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट होते आणि एम् ५ वर तिरंगा फडकवून मोहिमेतील मुलींनी ते साध्य केले.

स्लाइड शोमध्ये सुरुवातीला दिसते ती खळाळती बिआसनदी आणि तिच्या काठांवरील गर्द वनराई आणि त्यानंतर दिसतो १३०५० इतक्या उंचीवरील रोहतांगपासचा रस्ता. एवढ्या उंचीवर जगात फारच थोडे रस्ते आहेत. मार्चमध्ये पडलेल्या बर्फामुळे ६ महिन्यांनंतरही रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ७/८ फूट उंचीच्या बर्फाच्या भिंती उभ्या असलेल्या दिसत होत्या. यानंतर दिसतात बेसकॅम्पमधील मुक्कामाची दृश्ये. यात एकीच्या मागे दुसरी, दुसरीच्या मागे तिसरीने उभे राहून एकमेकींची वेणी घालण्याचे दृश्य खासच होते. बेसकॅम्पपर्यंत पोचण्यासाठी या पथकाला तीन दिवस पायी प्रवास करून यावे लागले आणि कॅम्पला आल्यावर लक्षात आले की, स्टोव्हचे पॅकेज मागच्याच ठिकाणावर विसरले आहे ! ते येईपर्यंत केवळ डाग मोजण्याच्या चुकीपायी पथकाला तीन दिवस गमवावे लागले ! उषाताईंनी छायाचित्रणासाठी मात्र या वेळेचा भरपूर उपयोग करून घेतला आणि मिलांग डोंगराच्या शिखरांची अनेक मनोरम दृश्ये टिपली. कुठे पांढरे शुभ्र बर्फ आणि काळी–कबरी शिखरे, तर कुठे ढगांच्या शालीत लपेटलेली बर्फाच्छादित उत्तुंग शिखरे. यातील सूर्यास्ताच्या वेळची दृश्ये तर फारच सुंदर होती. पथकाच्या वाटचालीतील भीषण हिमच्छाया, फेसाळत्या नद्या यांची दृश्ये रोमांचक होती. यांपैकीच एका दृश्यात दिसले एका जर्मन महिलेचे साधेसेच स्मारक. गिर्यारोहणाच्या

खेळाचे हे एक अविभाज्य अंगच आहे असे म्हणावयास हवे. नंतर दिसतात 'मुल्किला' मोहिमेच्या चढाईतील काही टप्पे आणि एम ५ या शिखरावर फडकवलेला भव्य तिरंगा. अखेरीस पडद्यावर आले, गिर्यारोहकांच्याच परिभाषेत सांगायचे तर डोंगरबंधु अश्विनचे छायाचित्र !

साहसाची विलक्षण ओढ असलेल्या अश्विनला श्रद्धांजली वाहण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम अतिशय उचित असाच होता. सह्याद्रीतील अवघड कडे आणि गड चढण्याचा छंद आणि नेव्हीमध्ये मरीन इंजिनियर होण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या अश्विनची मूळ प्रेरणाच साहसाची होती. त्याला हिमालयाच्या शिखरांच्या हाकांपासूनही कोण थोपवू शकले असते ? सिंहगडाच्या ज्या कड्यावरून चढण्याच्या प्रयत्नात अश्विनला मृत्यु आला, त्यापेक्षाही अवघड कडे त्याआधीच तो लीलया चढून गेलेला होता. असे असताना त्या वेळच्या त्याच्या साहसाला अविचारी तरी कसे म्हणायचे ? वास्तविक एवढ्या लहान वयातच अश्विनची समजूत, विचारांची परिपक्वता, ठामपणा हे सर्व कौतुकास्पद होते. मी ते जवळून पाहिलेले आहे. प्रथमदर्शनी अबोल आणि अंतर्मुख वाटणारा अश्विन अतिशय स्नेहशील आणि मिष्किलही होता.

अश्विनने खेळांमध्ये मिळविलेले यश थोडक्यात सांगायचे तर असे आहे–खोखोच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये त्याने एकूण सात सुवर्ण,एक रौप्य व एक ब्राँझ पदक मिळविले. त्यांपैकी पाच वेळा तो संघाचा कप्तान होता ! या स्पर्धांमुळे एवढ्या लहान वयातच त्याचा भारताच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत प्रवास झाला होता. नौकानयनातही त्याने अल्पावधीतच उत्कृष्ट यश संपादन केले होते. इंजिनियरिंगचा तो रोइंग ज्युनियर चॅम्पियन होता, तर गतवर्षीच मद्रास येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत त्याने एका सहकाऱ्यासह महाविद्यालयाला प्रथमच ब्राँझ पदक मिळवून दिले आणि त्याच वेळी झालेल्या आशियाई रोइंग स्पर्धेतही त्याने भाग घेतला. असा हा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा क्रीडापटू अतिशय अनपेक्षितपणे काळाने आपल्यातून ओढून नेला आहे !

कार्यक्रमाच्या शेवटी अश्विनला श्रद्धांजली वाहताना प्रा. विजय परांजपे म्हणाले, 'गिर्यारोहणाच्या खेळात गोड आणि कडू असे दोनही भाग येतात. आपल्या सर्वांनाच ज्याचा अभिमान वाटावा असा आपला मित्र, डोंगरबंधू अश्विन याला गिर्यारोहणाच्या प्रयत्नातच मृत्यु आला; पण म्हणून आपण या खेळातून मागे हटणे बरोबर होणार नाही. या खेळातील जिद्द, स्पिरिट तेवत ठेवून हा खेळ चालू ठेवण्यानेच त्याच्या स्मृतीला आपण जागलो असे होणार आहे. कमीत कमी धोका पत्करून आणि जास्तीत जास्त धाडस दर्शवून आपण हा खेळ चालू ठेवला पाहिजे !

विशेष हे की अश्विनचे आई–वडील स्वतःचे दुःख सावरून या कार्यक्रमाला धीराने आणि आस्थेने उपस्थित होते !

–अनिल काळे


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**

**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

**लेखक : वि. ग. कानिटकर**

**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**

**किंमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**




# प्रश्न ?

प्रश्न सतावणारे, प्रश्न अस्वस्थ करणारे,
प्रश्न मेंदू पोखरणारे, प्रश्न भेडसावणारे,
प्रश्न निराश करणारे, प्रश्न वैताग आणणारे...
नवा उद्योग सुरु करणाऱ्या कल्पक आणि
महत्त्वाकांक्षी उद्योजकांपुढील आर्थिक प्रश्न
सोडविण्यास महाबँक सदैव तत्पर!

बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा.

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी:- लोकमंगल १५०१ शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

NAWADKAR